पुणे BAR & BENCH

Journalism For Justice!

▪ PRGI No. : MHBIL/25/A1380

◆ वर्ष १ ◆ अंक : ४२ ◆ साप्ताहिक ◆ पुणे, सोमवार, दिनांक १५ जून ते २१ जून २०२६ ◆ Email : punebarandbench@gmail.com ◆ पाने : १६ ◆ स्वागतमूल्य : १० रु.

अंक व जाहिरातींसाठी : ९९२२४१२४५१

बॅरिस्टर बनायचे आहे?

थेट लंडनमध्ये बॅरिस्टर बनण्याचे स्वप्न पाहत असाल, तर हा प्रवास आव्हानात्मक असा तरी योग्य नियोजनाने यश नक्की मिळेल!

पान ७

SUPER OFFER

पुणे BAR & BENCH

सर्व प्रकारच्या जाहीर सूचना/ वकील नोटीस आणि अन्य जाहिराती स्वीकारण्याकरिता संपर्क : श्रेयश दहिवळ, मो. ९९२२४१२४५१, ऑफिस संपर्क : ०२०-२९९९ २५३०

epaper.mahabarbench.com

वर्गणीचे पर्याय | स्वागत मूल्य : फक्त रु. १० एक वर्षासाठी रु. ५००

रक्कम भरल्याची पेमेंट रिसीट,आपले नाव, पिनकोडसह पूर्ण पत्ता आणि मोबाईल नंबर : ९९२२४१२४५१ या क्रमांकावर मॅसेज करा!

QR Code स्कॅन करा, पे करा.

महाराष्ट्र आणि गोवा वकील परिषदेच्या निवडणुकीत पुणे जिल्ह्याचा दबदबा. २३ पैकी सर्वाधिक आठ उमेदवार पुण्यातून विजयी

विजयी उमेदवार आठ; अव्वल अॅड. शिरसाट!

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

राज्यातील वकिलांची शिखर संघटना असलेल्या महाराष्ट्र आणि गोवा वकील परिषदेच्या निवडणुकीत पुणे जिल्ह्याने दबदबा निर्माण केला आहे. या निवडणुकीत २३ पैकी सर्वाधिक आठ उमेदवार पुण्यातून विजयी झाले आहेत. आठमधील सहा वकील सर्वसाधारण गटातून विजयी झाले आहेत. तर महिला राखीव गटातून दोन उमेदवार विजयी झाले आहेत. विशेष म्हणजे राज्यात दुसरा आणि तिसरा क्रमांक पुण्यातील उमेदवारानेच पटकाविला आहे. नागपूर येथील अॅड. पारिजात पांडे राज्यात पहिल्या क्रमांकाने निवडून आले आहेत. जिल्ह्यातील उमेदवारांपैकी अॅड. गणेश शिरसाट सर्वाधिक मते मिळवून विजयी झाले आहेत.

त्यांनी राज्यात दुसरा क्रमांक पटकाविला आहे. त्यानंतर अॅड. राजेंद्र उमाप हे जिल्ह्यातून दुसऱ्या आणि राज्यातून तिसऱ्या क्रमांकाची मते घेऊन विजयी झाले आहेत.

उमाप हे मागील वेळीही विजयी झाले होते, त्यांनी परिषदचे अध्यक्ष म्हणून काम पाहिले आहे. त्याखालोखाल विठ्ठल कोंडे -देशमुख विजयी झाले. देशमुख यांनी मुंबई येथून अर्ज भरला असला, तरीही ते मुळचे खेड शिवापूरचे आहेत.

महिला राखीव गटातून अॅड. रंजना भोसले आणि अॅड. माधवी पोतदार विजयी झाले आहेत. या निवडणूकीसाठी पान ४ पहा

YUVRAJ DHAMALE CORP

'युवराज ढमाले कोर्प' कडून पुणे BAR & BENCH वृत्तपत्राला पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!

पुणे जिल्हा आणि सत्र न्यायालय परिसर कोर्ट चार्ट

स्मॉल कॉज कोर्ट (तळमजला)

नवीन कोर्टांची नावे

- मा. जी. जी. इटकळकर
- मा. एम. डी. ठोंबरे ७ वे
- मा. जी. एन. बाग्रोडिया
- मा. एस. के. दुगांवकर
- मा. ए. एस. शिंदे ४ थे

स्मॉल कॉज कोर्ट पहिला मजला

डावी बाजू	उजवी बाजू
मा. एस. डब्ल्यू उगले २ रे	मा. दासरी
मा. ए. एस. मुंडे	मा. सावरकर ६ वे
मा. आर. वाय. तांबोळी	मा. पी. बी. भोसले
मा. एम. के. कोथुळे ५ वे	
मा. एन. जी. गोसावी ४ थे	

सिव्हिल बिल्डिंग तळमजला

डावी बाजू	उजवी बाजू
मा. एस. एस. कदम ९ वे	मा. यू. पी. देवर्षी
मा. एस. डी. पंजवाणी	मा. एस. पी. केस्तीकर
मा. एस. एन. रतकंठवार २ रे	मा. एस. एन. हरगुट जेएमएफसी १५ वे
मा. जे. जी. पवार १२ वे	मा. जे. एम. आंबोडकर ७ वे

सिव्हिल बिल्डिंग पहिला मजला

डावी बाजू	उजवी बाजू
मा. जे. व्ही. पेखलेपुरकर	मा. फड
मा. पी. जैन देसरडा	मा. डी. एम. माता
मा. ढेकळे	मा. ए. यू. सुपेकर

नवीन इमारत पहिला मजला

डावी बाजू	उजवी बाजू
मा. व्ही. व्ही. गिरम	मा. पी. बी. पाटील
मा. एस. आर. बाडवे ८ वे	मा. ए. सी. बागल ९ वे
मा. आर. ए. मळकोळीकर पाठक २० वे	मा. व्ही. आय. भंडारी
मा. एम. आर. जाधव	मा. एम. पी. भावसार
मा. एस. एम. साकळे	मा. जी. आर. डोरनापल्ले ७ वे

नवीन इमारत दुसरा मजला

डावी बाजू	उजवी बाजू
मा. बी. डी. कुलकर्णी १८ वे	मा. आर. जी. बागडे
मा. एस. जी. जोशी	मा. ए. एल. अमुदी प्रभारी
मा. ए. एस. शर्मा	मा. ए. पी. कानडे ९ वे
मा. के. डी. शिरभाते ११ वे	मा. पी. पी. केस्तीकर
मा. एस. आर. अग्रवाल प्रभारी	सीबीआय मा. आर. आर. मेंढे १९ वे
मा. आर. के. राजेभोसले	मा. अनिरुद्ध गांधी ५ वे
मा. ए. वाय. थत्ते	मा. एस. एस. सास्ते
मा. वाय. डी. कोइंकार २१ वे	मा. आर. आर. बेडगकर
मा. एस. आर. अग्रवाल	मा. के. पी. क्षीरसागर २० वे
मा. ए. व्ही. चौधरी इनामदार	मा. एस. ए. मुळीक
मा. एस. व्ही. उटकर	मा. डी. आर शेट्टी १५ वे
मा. एस. आर. साळुंखे ९ वे	मा. एस. एम. टाकळीकर
मा. एच. एम. भोसले	मा. डी. जे. पाटील

डिस्ट्रिक्ट बिल्डिंग तळमजला

नवीन कोर्टांची नावे

मा. डी. एस. देशमुख
मा. ए. एस. गांधी
मा. एस. बी. पाटील
मा. यू. पी. कुलकर्णी
मा. ए. ए. शिंदे
मा. आर. के. क्षीरसागर
मा. एच. के. भालेराव
मा. एस. डी. कुलकर्णी

डिस्ट्रिक्ट बिल्डिंग पहिला मजला

नवीन कोर्टांची नावे

मा. एस. एस. कंठाळे
मा. ए. के. शर्मा
मा. पी. आर. चौधरी
मा. अरविंद टी. वानखेडे
मा. पी. वाय. लाडेकर
मा. व्ही. आर. कचरे
मा. एच. के. भालेराव
मा. एस. डी. कुलकर्णी

न्यायाधीश व कर्मचाऱ्यांची संख्या तातडीने वाढविण्याची पिंपरी-चिंचवड बारची मागणी

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

पुणे जिल्ह्याचे नव्याने नियुक्त झालेले प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश ए. टी. वानखेडे यांची पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी पुणे जिल्हा न्यायालयात सदिच्छा भेट घेऊन पुष्पगुच्छ देत स्वागत केले.

या प्रसंगी बार असोसिएशनच्या वतीने नव्याने सुरू झालेल्या अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय तसेच दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) येथे न्यायालयीन कर्मचारी व न्यायाधीशांची मोठ्या प्रमाणात कमतरता असल्याने न्यायालयीन कामकाजावर ताण निर्माण होत असून प्रलंबित प्रकरणांची संख्या वाढत असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले.

बार असोसिएशनचे सचिव ॲड. उमेश खंदारे यांनी यासंदर्भात प्रमुख जिल्हा न्यायाधीशांना निवेदन सादर करून मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याची मागणी केली. तसेच नेहरूनगर न्यायालय व मोरवाडी न्यायालय येथे वकील, पक्षकार आणि न्यायालयीन कर्मचाऱ्यांना भेडसावणाऱ्या विविध पायाभूत सुविधा, प्रशासकीय अडचणी व दैनंदिन कामकाजातील समस्यांबाबतही सविस्तर चर्चा करण्यात आली. यावर कायमस्वरूपी व प्रभावी तोडगा काढण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतील, असे आश्वासन प्रमुख जिल्हा न्यायाधीशांनी दिले.

बार आणि बेंच यांच्यातील समन्वय, परस्पर सहकार्य आणि सुसंवाद अधिक दृढ करण्यासाठी आपण कटिबद्ध असून वकिलांच्या हिताशी संबंधित प्रश्न सोडविण्यासाठी बार असोसिएशनला आवश्यक ते सर्व सहकार्य केले जाईल, असे मतही प्रमुख जिल्हा न्यायाधीशांनी व्यक्त केले. या भेटीप्रसंगी बार असोसिएशनचे सचिव ॲड. उमेश खंदारे, महिला सचिव ॲड. रीना मगदूम, माजी सचिव ॲड. धनंजय कोकणे, विद्यमान सदस्य ॲड. संकेत सरोदे, ॲड. राजेश राजपुरोहित, ॲड. विकास शर्मा तसेच न्यायालयीन कर्मचारी उपस्थित होते. पिंपरी-चिंचवड शहरातील न्यायव्यवस्था नागरिकाभिमुख करण्यासाठी बार असोसिएशन सातत्याने पाठपुरावा करीत असून प्रशासनाशी समन्वय साधून प्रयत्न सुरू ठेवणार असल्याचे मत बार असोसिएशनचे सचिव ॲड. उमेश खंदारे यांनी नमूद केले.

नॅशनल लॉ स्कूल बेंगळुरूकडून महिला वकिलांसाठी 'विल' उपक्रम

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

भारतातील कायदेशीर क्षेत्राचा दर्जा उंचावण्यासाठी आणि वकिली व्यवसायात समानता, सर्वसमावेशकता व न्याय वाढवण्यासाठी 'नॅशनल लॉ स्कूल ऑफ इंडिया युनिव्हर्सिटी'ने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. एनएलएसआययूने ११ जून रोजी 'सेंटर फॉर द स्टडी ऑफ द लीगल प्रोफेशन' या विशेष केंद्राच्या स्थापनेची घोषणा केली आहे.

या केंद्राच्या माध्यमातून देशातील कायदेशीर व्यवसायाची रचना, नियम आणि पद्धतींचा सखोल अभ्यास केला जाईल. तसेच वस्तुस्थितीवर आधारित संशोधन आणि धोरणात्मक सहभागाद्वारे वकिली क्षेत्रातील आव्हाने समजून घेण्याचा प्रयत्न केला जाईल.

हे केंद्र आगामी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून आपल्या संशोधन कार्याला सुरुवात करणार आहे. या अंतर्गत 'विमेन्स इन्क्लुजन अँड लीडरशिप इन लॉ' हा पाच वर्षांचा महत्त्वाकांक्षी उपक्रम सुरू केला जाईल. भारतात महिला वकिलांचा न्यायालयात प्रत्यक्ष वकिली करण्यातील सहभाग वाढवणे आणि त्यांना नेतृत्व पदे मिळवून देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या उपक्रमाद्वारे विविध सामाजिक आणि आर्थिक पार्श्वभूमीतून येणाऱ्या, करिअरच्या सुरुवातीच्या टप्प्यात असलेल्या महिला वकिलांना आवश्यक ते सहकार्य पुरवले जाईल. जेणेकरून त्या वकिली क्षेत्रात टिकून राहू शकतील आणि भविष्यात वरिष्ठ पदांपर्यंत पोहोचू शकतील.

पुणे जिल्हा प्रमुख न्यायाधीशपदी श्री. अरविंद टी. वानखेडे यांची नियुक्ती झाल्याबद्दल पुणे बार असोसिएशनतर्फे दिनांक १० जून २०२६ रोजी सत्कार करण्यात आला. मा. पुणे बार असोसिएशनचे अध्यक्ष काळूराम भुजबळ लतसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीकांत कानेटकर सर यांनी वकिलांना येणाऱ्या दैनंदिन अडचणी मनोगताद्वारे व्यक्त केल्या. सिनियर वकील व न्यायाधीश ह्यांची त्या कामी समिती स्थापन करण्याची विनंती केली. त्यास मा. जिल्हा न्यायाधीश ह्यांनी सकारात्मकता दर्शवली आहे.

जाणून घ्या कायद्याची भाषा

- **बंदी प्रत्यक्षीकरण (Habeas Corpus):** बेकायदेशीरपणे अटक केलेल्या व्यक्तीला न्यायालयात प्रत्यक्ष हजर करण्याचा सर्वोच्च किंवा उच्च न्यायालयाचा आदेश.
- **परमादेश (Mandamus):** एखाद्या सरकारी अधिकाऱ्याला किंवा संस्थेला त्यांचे कायदेशीर कर्तव्य पार पाडण्यासाठी न्यायालयाने दिलेला हुकूम.
- **उत्प्रेषण (Certiorari):** कनिष्ठ न्यायालयाचा निर्णय रद्द करून तो खटला पुनरावलोकनासाठी स्वतःकडे मागवून घेण्याचा वरिष्ठ न्यायालयाचा आदेश.
- **अधिकार पृच्छा (Quo Warranto):** एखादी व्यक्ती कोणत्या कायदेशीर अधिकाराने सरकारी पदावर कार्यरत आहे, अशी विचारणा करणारा न्यायालयाचा आदेश.
- **प्रतिषेध (Prohibition):** कनिष्ठ न्यायालयाला त्याच्या अधिकारक्षेत्राबाहेर जाऊन काम करण्यापासून रोखणारा वरिष्ठ न्यायालयाचा मनाई हुकूम.
- **न्यायालयीन पुनर्विलोकन (Judicial Review):** संसदेने केलेले कायदे किंवा सरकारने घेतलेले निर्णय संविधानानुसार योग्य आहेत की नाही, हे तपासण्याचा न्यायालयाचा अधिकार.
- **अल्ट्रा व्हायरस (Ultra Vires):** अधिकाराबाहेर किंवा कायदेशीर मर्यादेपलीकडे जाऊन केलेली कृती.
- **क्रो प्रीडीकेट / प्राइमा फेशी (Prima Facie):** प्रथमदर्शनी; वरवर पाहता उपलब्ध असलेल्या पुराव्यांवरून सिद्ध होणारी बाब.
- **सुओ मोटो (Suo Motu):** न्यायालयाने कोणत्याही पक्षाच्या अर्जाशिवाय, स्वतःहून घेतलेली दखल किंवा सुरू केलेली कारवाई.
- **रेस ज्युडिकाटा (Res Judicata):** ज्या प्रकरणावर न्यायालयाने आधीच अंतिम निर्णय दिला आहे, तोच वाद त्याच पक्षांमध्ये पुन्हा न्यायालयात आणता येत नाही हा नियम.
- **केव्हिएट एम्प्टर (Caveat Emptor):** 'खरेदीदाराने सावध राहावे'; वस्तू किंवा मालमत्ता खरेदी करताना स्वतः तपासणी करण्याची खरेदीदाराची जबाबदारी.
- **मेन्स रिया (Mens Rea):** गुन्हेगारी हेतू किंवा वाईट बुद्धी; फौजदारी कायद्यात गुन्हा सिद्ध करण्यासाठी गुन्हेगारी हेतू असणे आवश्यक असते.
- **विशिष्ट पूर्तता (Specific Performance):** कराराचा केवळ भंग केल्याबद्दल नुकसानभरपाई न देता, करारातील अटी जशाच्या तशी पूर्ण करण्याचा न्यायालयाचा आदेश.
- **इजमेंट हक्क / सुखाचार (Easementary Rights):** दुसऱ्याच्या जमिनीवरून जाण्याचा रस्ता, हवा किंवा पाण्याचा वापर करण्याचा मिळणारा कायदेशीर हक्क.
- **परतावा / पुनर्संचयन (Restitution):** बेकायदेशीरपणे घेतलेली मालमत्ता किंवा हक्क मूळ मालकाला परत देण्याची न्यायालयाची आज्ञा.
- **मुदतबाह्य (Barred by Limitation):** कायद्याने ठरवून दिलेल्या मुदतीत खटला दाखल न केल्यामुळे न्याय मागण्याचा हक्क संपुष्टात येणे.

शांतता...हे कोर्ट आहे! पुणे BAR & BENCH

महिला रजिस्ट्रारची ६.४९ लाखांची सायबर फसवणूक!

ॲड. कविता सोळुंके यांच्या कायदेशीर मार्गदर्शनामुळे आणि पाठपुराव्यामुळे बँक ऑफ इंडियाकडून संपूर्ण रक्कम परत, गॅस बिल अपडेटच्या नावाखाली मुंबई उच्च न्यायालयाच्या रजिस्ट्रारची फसवणूक

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

मुंबई उच्च न्यायालयातील सहाय्यक रजिस्ट्रार वर्षा विनोद शिंदे यांना 'एमजीएल गॅस बिल अपडेट' करण्याच्या बहाण्याने ६ लाख ४९ हजार ५२० रुपयांचा मोठा गंडा घातल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. सायबर चोरांनी अतिशय हुशारीने जाळे विणून हा आर्थिक गुन्हा केला होता. मात्र, फसवणूक झाल्याचे लक्षात येताच तक्रारदार महिलेने दाखवलेली कमालीची तत्परता, प्रसिद्ध कायदेतज्ज्ञ ॲडव्होकेट कविता सोळुंके यांचे तज्ज्ञ कायदेशीर मार्गदर्शन आणि मुंबईच्या काळाचौकी पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा यामुळे अवघ्या काही दिवसांतच बँक ऑफ इंडिया व संबंधित विमा कंपनीकडून पीडित महिला अधिकाऱ्याला त्यांची संपूर्ण रक्कम व्याजासह परत मिळाली आहे.

पोलीस प्रशासनाकडून मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, मूळच्या मुंबईतील घोडपदेव भागातील रहिवासी असलेल्या तक्रारदार वर्षा शिंदे या मुंबई उच्च न्यायालयात सहाय्यक रजिस्ट्रार म्हणून कार्यरत आहेत. त्यांचे बँक ऑफ इंडियाच्या फोर्ट येथील मुख्य शाखेमध्ये बचत खाते आहे आणि या खात्याचा वापर त्या स्वतःच नियमितपणे करत असतात. ३१ मार्च २०२६ रोजी नेहमीप्रमाणे दैनंदिन कामे सुरू असताना सायंकाळच्या सुमारास त्यांच्या व्हॉट्सॲप क्रमांकावर एका अनोळखी मोबाईल क्रमांकावरून संदेश आला. त्यामध्ये 'एमजीएल.बिल अपडट एपीके' नावाची एक संशयास्पद फाईल पाठवण्यात आली होती.

हा संदेश आल्यानंतर अवघ्या काही वेळातच म्हणजे साधारण संध्याकाळी ७ च्या सुमारास त्यांना एका अज्ञात इसमाचा व्हॉट्सॲप कॉल आला. समोरून बोलणाऱ्या व्यक्तीने आपली ओळख दीपक जोशी, एमजीएल गॅस ऑफिसर अशी करून दिली. अत्यंत व्यावसायिक भाषेत बोलून त्याने वर्षा शिंदे यांना सांगितले की, तुमच्या

गॅस कनेक्शनची अंतिम मुदत आजच संपत आहे. तुम्ही जर आजच्या आज बिल अपडेट केले नाही, तर तुमचे गॅस कनेक्शन कायमचे बंद केले जाईल. सरकारी गॅस जोडणी खंडित होईल या भीतीने आणि गडबडीत वर्षा शिंदे यांनी समोरच्या व्यक्तीच्या सांगण्यावर पूर्ण विश्वास ठेवला. त्यांनी सायबर चोराने पाठवलेली ती घातक फाईल आपल्या मोबाईलमध्ये डाऊनलोड केली आणि समोरच्या व्यक्तीने मागितल्यानुसार आपला ईमेल आयडी देखील त्याच्याशी शेअर केला.

ईमेल आयडी आणि फाईलच्या माध्यमातून चोरांनी त्यांच्या मोबाईलचा संपूर्ण ताबा मिळवला. त्यानंतर १ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ८.१५ च्या सुमारास वर्षा शिंदे यांच्या बँक खात्यातून तब्बल ६,४९,५२०.३८ रुपये वेगवेगळ्या तीन मोठ्या ट्रान्झॅक्शनद्वारे परस्पर लांबवण्यात आले. यामध्ये डिजिटल सेवा, क्रेडिट कार्ड बिल पेमेंट आणि लोन रिपेमेंटच्या नावाखाली हे पैसे अत्यंत हुशारीने वळवण्यात आले होते.

> *अधिकारी महिलेने दाखवलेली तत्परता आणि आम्ही घेतलेले योग्य कायदेशीर निर्णय यामुळेच बँक आणि विमा कंपनीकडून संपूर्ण रक्कम व्याजासह परत मिळवून देण्यात आम्हाला यश आले.*
> *–ॲड. कविता सोळुंके*

आपली फसवणूक झाल्याचे निदर्शनास येताच वर्षा शिंदे यांनी अजिबात वेळ वाया न घालवता अत्यंत हुशारीने सर्वात आधी केंद्र सरकारच्या '१९३०' या सायबर हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधला आणि आपली प्राथमिक तक्रार नोंदवली. त्यानंतर त्यांनी थेट मुंबईतील काळाचौकी पोलीस ठाणे गाठले. तेथे त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर घडलेला सर्व प्रकार लेखी स्वरूपात मांडला.

वर्षा शिंदे यांच्या लेखी जबाबावरून काळाचौकी पोलिसांनी १ एप्रिल २०२६ रोजी तात्काळ गुन्हा नोंदवून घेतला.या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत राऊत यांनी सायबर सेलच्या मदतीने या प्रकरणाचा तांत्रिक तपास आणि पैशांचा माग काढण्याचे काम वेगाने हाती घेतले.

ॲडव्होकेट्सच्या मदतीने कायदेशीर लढा:

या कठीण प्रसंगामध्ये वर्षा शिंदे यांना प्रसिद्ध कायदेतज्ज्ञ ॲड. कविता सोळुंके यांचे कायदेशीर मार्गदर्शन लाभले. ॲड. कविता सोळुंके यांनी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या अधिकृत ग्राहक संरक्षण नियमांचा आधार घेत बँकेला घेरण्याचे ठरवले. आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, जर एखाद्या सायबर गुन्ह्यात ग्राहकाची कोणतीही थेट चूक, निष्काळजीपणा किंवा पासवर्ड वाटप नसेल आणि फसवणूक झाल्यापासून ग्राहकाने ३ दिवसांच्या आत (या प्रकरणात अवघ्या काही तासांतच) बँकेला आणि सायबर पोलिसांना सूचित केले असेल, तर ग्राहकाची आर्थिक जबाबदारी शून्य ठरते. अशा परिस्थितीत चोरीला गेलेली संपूर्ण रक्कम परत करण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित बँकेची असते. ॲड. सोळुंके यांच्या अचूक सल्ल्यानुसार बँक ऑफ इंडियाच्या व्यवस्थापकांकडे आणि बँकिंग ओम्बुड्समन यांच्याकडे एक सविस्तर कायदेशीर तक्रार अर्ज दाखल करण्यात आला. यामध्ये पोलिसांकडे दाखल असलेल्या प्रथम खबर अहवालाची प्रत आणि सायबर सेलचा अहवाल जोडण्यात आला. यामुळे बँकेला या प्रकरणाची गंभीर दखल घेणे भाग पडले.

बँकेकडून व्याजासह ६.४९ लाख रुपये परत; पीडितेने मानले आभार:

कायदेशीर प्रक्रियेचा अत्यंत अचूक व प्रभावी वापर, ॲड. कविता सोळुंके यांनी केलेला कायदेशीर पाठपुरावा आणि काळाचौकी पोलीस ठाण्याच्या टीमने बँकेकडे आणि विमा कंपनीकडे ठेवलेला सततचा संपर्क यामुळे अखेर या लढ्याला मोठे यश आले. बँक ऑफ इंडिया आणि संबंधित विमा कंपनीने तांत्रिक चौकशी पूर्ण करून वर्षा शिंदे यांचे सायबर चोरांनी पळवलेले ६ लाख ४९ हजार रुपये पूर्णपणे त्यांच्या मूळ बँक खात्यात जमा केले, इतकेच नव्हे तर त्यावर लागणारे नियमानुसार व्याजही बँकेने खात्यात परत दिले.

आपले हक्काचे कष्टाचे पैसे सुरक्षितपणे परत मिळाल्यानंतर वर्षा शिंदे यांच्या जीवात जीव आला. त्यांनी कायदेतज्ज्ञ ॲड. कविता सोळुंके आणि काळाचौकी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत राऊत व त्यांच्या संपूर्ण टीमचे जाहीर आभार मानले आहेत. या प्रकरणी सविस्तर कायदेशीर बाजू मांडताना ॲड. कविता सोळुंके म्हणाल्या,

"सायबर फसवणुकीच्या गुन्ह्यांमध्ये 'वेळ' हा अत्यंत महत्त्वाचा घटक असतो. अनेकदा नागरिक फसवणूक झाल्यावर घाबरून जातात किंवा काय करावे हे न समजल्याने वेळ घालवतात. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या नियमांनुसार, जर ग्राहकाची कोणतीही चूक नसेल आणि सायबर फसवणूक झाल्यापासून तीन दिवसांच्या आत बँकेला लेखी कळवले, तर ग्राहकाची कोणतीही आर्थिक जबाबदारी राहत नाही. सायबर फ्रॉड झाल्यास नागरिकांनी न घाबरता तात्काळ १९३० या हेल्पलाईनवर आणि तज्ज्ञ कायदेतज्ज्ञांच्या मदतीने बँकेकडे दाद मागावी."

पान १ वरून

विजयी उमेदवार आठ; अव्वल ॲड. शिरसाट!

महाराष्ट्र, गोवा, दादर नगर हवेली आणि दमण दीव येथील मिळून १५५ उमेदवार निवडणूक रिंगणात आहे. यंदा पहिल्यांदाच महिलांना आरक्षण देण्यात आले आहे. २५ ऐवजी २३ जागांसाठी मतदान होत आहे. यामध्ये १८ जण सर्वसाधारण गटातून विजयी झाले आहेत. परिषेदासाठी एकुण १ लाख ९० हजार ते १ लाख ९५ हजार वकील मतदानाचा हक्क बजावला. त्यापैकी पुणे जिल्ह्यातील २४ ते २५ हजार मतदारांचा समावेश आहे.

दोन उमेदवार सर्वोच्च न्यायालय नियुक्त करणार

निवडणुकीत राज्यातील २५ पैकी २३ उमेदवार विजयी झाले आहेत. उर्वरित २ उमेदवार उच्च न्यायालय निश्चित करणार आहे. हे दोन्ही उमेदवार महिला असणार आहेत. याबाबतचा प्रस्ताव बार कौन्सिल ऑफ इंडियाकडून न्यायालयात पाठविण्यात आला आहे. पुण्यात वाढलेली नोंदणी आणि त्याच तुलनेत झालेले मतदान यामुळे यंदा पुण्याने बाजी मारली आहे.

क्र.	राज्यातील क्रमवारीनुसार विजयी उमेदवार	
१	पांडे पारिजात मधुसूदन	सर्वसाधारण
२	शिरसाट गणेश बाप्पासाहेब	सर्वसाधारण
३	उमाप राजेंद्र बाबुराव	सर्वसाधारण
४	देशमुख आशिष पंजाबराव	सर्वसाधारण
५	थोबडे मिलिंद शिवशंकर	सर्वसाधारण
६	देसाई संग्राम दत्तात्रय	सर्वसाधारण
७	जायभावे जयंत दत्तात्रय	सर्वसाधारण
८	कोंडेदेशमुख विठ्ठल भाऊराव	सर्वसाधारण
९	अनभुले राजेंद्र दत्तात्रय	सर्वसाधारण
१०	वारुंजीकर उदय प्रकाश	सर्वसाधारण
११	चव्हाण गजानन बाबाजी	सर्वसाधारण
१२	साळुंखे वसंत दिगंबरराव	सर्वसाधारण
१३	ढगे पाटील विकास विठ्ठलराव	सर्वसाधारण
१४	देशमुख सतीश आबाराओ	सर्वसाधारण
१५	बागुल ज्ञानेश्वर सुरेश	सर्वसाधारण
१६	घाटगे विवेकानंद नाईकराव	सर्वसाधारण
१७	कुरेशी आसिफ शौकत	सर्वसाधारण
१८	पठाण अहमदखान उस्मानखान	सर्वसाधारण

पुण्यातील विजयी वकील

- ॲड. गणेश शिरसाट
- ॲड. राजेंद्र उमाप
- ॲड. विठ्ठल कोंडे - देशमुख
- ॲड. राजेंद्र अनभुले
- ॲड. विकास ढगे-पाटील
- ॲड. अहमदखान पठाण
- ॲड. रंजना भोसले
- ॲड. माधवी पोतदार

विजय उमेदवारांचा जिल्हा व विजयी उमेदवार

मुंबई – १ । ठाणे – १ । पुणे – ६
सिंधुदुर्ग – १ । सोलापूर –१ । कोल्हापूर – १
संभाजीनगर – २ । हिंगोली – १
नागपूर – २ । नाशिक – १
एकूण – १८ । यवतमाळ – १

विजयी महिला उमेदवार

पुणे – २ । मुंबई – २
नागपूर – १ । एकूण – ५

विजयी महिला उमेदवार (महिला आरक्षण)	
निर्वाचित उमेदवाराचे नाव	प्रवर्ग
भोसले रंजना रघुनाथ	आरक्षित (महिला)
वडाटकर वानखेडे क्षितीजा	आरक्षित (महिला)
कॅस्टेलिनो अनिता शेखर	आरक्षित (महिला)
पोतदार माधवी बाळ	आरक्षित (महिला)
भट्टड उमा अनिल	आरक्षित (महिला)

वरवरा राव यांच्या हैदराबादला जाण्याच्या अर्जावर मुंबई उच्च न्यायालयाने एनआयएकडून मागवले उत्तर

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com



भीमा कोरेगाव प्रकरणातील आरोपी, ज्येष्ठ कवी आणि सामाजिक कार्यकर्ते पी. वरवरा राव यांनी कायमस्वरूपी मुंबई सोडून हैदराबाद येथे राहण्याची परवानगी मिळावी यासाठी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. या याचिकेची दखल घेत न्यायमूर्ती ए. एस. गडकरी आणि न्यायमूर्ती कमल खाता यांच्या खंडपीठाने राष्ट्रीय तपास यंत्रणेला (NIA) उत्तर दाखल करण्याचे आदेश दिले असून, पुढील सुनावणी दोन आठवड्यांनंतर निश्चित केली आहे.

सर्वोच्च न्यायालयाने २०२२ मध्ये वरवरा राव यांना जामीन मंजूर करताना, विशेष एनआयए न्यायालयाच्या परवानगीशिवाय मुंबईबाहेर न जाण्याची अट घातली होती. याच अटीमध्ये शिथिलता मिळवण्यासाठी त्यांनी हा अर्ज केला आहे. १ जानेवारी २०१८ रोजी पुण्याच्या भीमा कोरेगाव येथे झालेल्या हिंसाचाराच्या मागे माओवादी संबंध आणि मोठा कट असल्याचा आरोप या प्रकरणात आहे. याप्रकरणी सुरुवातीला पुणे पोलिसांनी आणि नंतर 'एनआयए'ने मिळून एकूण १६ जणांना अटक केली होती. त्यापैकी ख्रिश्चन पाद्री आणि सामाजिक कार्यकर्ते पाद्र पास्टर स्टेन स्वामी यांचे २०२१ मध्ये कोठडीत असतानाच निधन झाले. सध्या या प्रकरणातील सर्व आरोपींना सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयाकडून जामीन मिळाला आहे. वरवरा राव यांना २०१८ मध्ये अटक करण्यात आली होती. मार्च २०२१ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने त्यांना वैद्यकीय कारणास्तव ६ महिन्यांचा तात्पुरता जामीन दिला होता. त्यानंतर, ऑगस्ट २०२२ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या प्रकृतीची गंभीर स्थिती पाहता त्यांना वैद्यकीय कारणास्तव नियमित जामीन मंजूर केला.

८० वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या वरवरा राव यांनी आपल्या अर्जात मुंबईत राहणे आता अत्यंत कठीण आणि खर्चिक झाल्याचे सांगितले आहे. त्यांच्या वतीने न्यायालयात खालील मुद्दे मांडण्यात आले. वरवरा राव आणि त्यांच्या ७६ वर्षीय पत्नीला वृद्धापकाळामुळे कौटुंबिक आधाराची गरज आहे. हैदराबाद येथे त्यांचे स्वतःचे घर असून तिथे त्यांचे सर्व नातेवाईक राहतात. तसेच त्यांची मुलगी आणि नात या वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत असल्याने त्यांना तिथे योग्य आरोग्य सेवा मिळू शकेल. मुंबईत राहणे आता आर्थिकदृष्ट्या परवडणारे राहिलेले नाही. त्यांना दरमहा सुमारे ५०,००० रुपये पेन्शन मिळते, तर मुंबईत राहण्याचा मासिक खर्च ७७,००० रुपयांपेक्षा जास्त होत आहे.

भटके-विमुक्त आणि आदिवासी समाजात कायदेविषयक जागरूकतेसाठी 'कायदा सोबती' प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

पुण्यातील कोथरूड येथील आय. आय.ई.जे.पी. नाईक सेंटर येथे 'कायदा सोबती नेतृत्व विकास प्रशिक्षक प्रशिक्षण' या चार दिवसीय निवासी कार्यशाळेचे दि. ५ जून ते ८ जून २०२६ या कालावधीत उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे, कोरो इंडिया, भटके-विमुक्त आदिवासी संयोजन समिती (महाराष्ट्र राज्य) आणि एस.एम.एस.सी. फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

समाजातील विशेषतः भटके-विमुक्त आणि आदिवासी समुदायामध्ये कायदेविषयक जागरूकता निर्माण करणे, तळागाळातील प्रश्नांवर कायदेशीर मार्गाने संघर्ष करण्यासाठी नेतृत्व तयार करणे, सामाजिक कार्यकर्त्यांवर दाखल होणाऱ्या खोट्या गुन्ह्यांमध्ये त्यांना कायदेशीर मदत उपलब्ध करून देणे तसेच कायद्याचे ज्ञान असलेल्या व्यक्तींकडून सामान्य नागरिकांचे होणारे शोषण व पिळवणूक रोखणे, या व्यापक सामाजिक उद्देशातून एस.एम.एस.सी. फाउंडेशनचे संस्थापक मनीष देशपांडे आणि ॲड. तृणाल टोणपे यांच्या संकल्पनेतून 'कायदा सोबती' उपक्रमाची निर्मिती करण्यात आली आहे.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मुमताज ताई यांनी भटके-विमुक्त आदिवासी संयोजन समितीच्या गेल्या चार वर्षांतील कार्याचा आढावा घेतला. महिलांचे प्रश्न, जात पंचायतीचे प्रश्न आणि समाजातील अन्याय-अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी समितीने केलेल्या प्रयत्नांची त्यांनी माहिती दिली. त्यानंतर मनीष देशपांडे यांनी या चार दिवसीय कार्यशाळेची सविस्तर रूपरेषा मांडली. कार्यशाळेचे उद्घाटन ॲड. पूजा तुपेरे यांच्या नेतृत्वाखाली भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित असलेल्या पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव तथा न्यायाधीश रेवती देशपांडे यांनी मोफत कायदेशीर मदत, लोकअदालती, मध्यस्थी प्रक्रिया तसेच नालसा योजनांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तळागाळातील लोकांपर्यंत शासनाच्या योजनांचा लाभ पोहोचविण्यासाठी सामाजिक कार्यकर्त्यांनी दुवा म्हणून कार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. तसेच पर्यावरण दिनाच्या निमित्ताने निसर्ग संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करत समाजहितासाठी ज्ञानाचा उपयोग करण्याचा संदेश दिला.

इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे प्रादेशिक उपसंचालक कुशल गायकवाड यांनी भटके-विमुक्त समाजाचा ऐतिहासिक संदर्भ आणि १८७१ च्या 'क्रिमिनल ट्राइब्स ॲक्ट'चा उल्लेख करून समाजाच्या सद्यस्थितीवर भाष्य केले. त्यांनी निवासी आश्रमशाळा, परराज्य शिष्यवृत्ती योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, वसंतराव नाईक तांडा-वस्ती सुधार योजना तसेच 'महाज्योती' संस्थेमार्फत उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या मोफत निवासी प्रशिक्षणासह विविध योजनांची माहिती दिली. उद्घाटन सत्राच्या शेवटी मानवाधिकार कायदेतज्ज्ञ ॲड. असीम सरोदे यांनी पर्यावरण दिनाचे औचित्य साधून विकासाच्या नावाखाली होणाऱ्या पर्यावरणाच्या ऱ्हासावर भाष्य केले. यानंतर मा. विवेक वेलणकर यांच्या 'माहितीचा अधिकार कायदा' या विषयावरील प्रशिक्षण सत्राला सुरुवात झाली. त्यांनी माहिती अधिकार कायद्याचे महत्त्व, अर्ज दाखल करण्याची पद्धत, अपील प्रक्रिया आणि माहिती लपविणाऱ्या अधिकाऱ्यांवर होणाऱ्या दंडात्मक कारवाईची सविस्तर माहिती दिली. माहितीचा अधिकार ही तक्रार निवारण यंत्रणा नसून माहिती व पुरावे मिळविण्याचे प्रभावी साधन असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यशाळेच्या दुसऱ्या दिवशी, ॲड. असीम सरोदे यांनी मानवी हक्क, भटक्या-विमुक्त समाजाचे अधिकार, पोलिस प्रक्रिया, खोट्या गुन्ह्यांविरोधातील कायदेशीर लढा, डिजिटल पुराव्यांचे महत्त्व तसेच संघटितपणे न्यायासाठी संघर्ष करण्याची गरज यावर मार्गदर्शन केले. दुपारच्या सत्रात सहभागींचे सहा गट करून मानवाधिकार उल्लंघनाशी संबंधित विविध विषयांवर नाट्यसादरीकरण करण्यात आले. बेकायदेशीर अटक, महिलांची सुरक्षा, मॉब लिंचिंग, शिक्षणाचा अधिकार आणि ॲट्रॉसिटी कायदा यांसारख्या विषयांवर प्रभावी सादरीकरणे झाली. मनीष देशपांडे आणि सचिन खाडे यांनी सत्राचे कुशल फॅसिलिटेशन केले, तर संपूर्ण कार्यक्रमाचे दस्तऐवजीकरण शरद भाऊ यांनी केले. तिसऱ्या दिवशी, निवृत्त उपजिल्हाधिकारी मा. प्रल्हाद कचरे यांनी लोकसेवा हक्क कायदा, नागरिकांची सनद, दप्तर दिरंगाई तसेच शासकीय कर्मचाऱ्यांवरील शिस्त व अपीलविषयक तरतुदींबाबत सविस्तर माहिती देऊन प्रशासन अधिक उत्तरदायी बनविण्यासाठी उपलब्ध असलेल्या कायदेशीर उपाययोजनांवर प्रकाश टाकला. कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी ॲड. तृणाल टोणपे आणि ॲड. निकिता आनंदाचे यांच्या हस्ते सर्व प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

राज्य महिला आयोगावरील नियुक्त्यांबाबत संभ्रम कायम!

मागील आर्थिक वर्षाच्या अखेरीस २,७०० हून अधिक तक्रारी प्रलंबित; माहिती अधिकारात उघड

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

महाराष्ट्र राज्य महिला आयोगातील रिक्त पदे आणि नियुयांच्या प्रक्रियेबाबत अद्याप कोणतीही स्पष्टता नसल्याचे समोर आले आहे. एका माहिती अधिकार (RTI) अर्जाला मिळालेल्या उत्तरावरून ही बाब उघड झाली असून, यामुळे महिला आयोगाच्या कामकाजावर आणि प्रलंबित प्रकरणांवर मोठा परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. राष्ट्रीय महिला आयोगाने (NCW) सर्व राज्य सरकारांना महिला आयोगांमधील रिक्त पदे तात्काळ भरण्याचे निर्देश दिलेले असतानाही, महाराष्ट्रात मात्र या नियुयांबाबत कमालीची गुप्तता किंवा दिरंगाई पाहायला मिळत आहे.

पुण्यातील प्रसिद्ध माहिती अधिकार कार्यकर्ते विहार दुर्वे यांनी राज्य महिला आयोगातील रिक्त पदे, नियुयांची प्रक्रिया आणि ती पदे भरण्याची निश्चित कालमर्यादा याबद्दल महिला व बालविकास विभागाकडे (WCD) सविस्तर माहिती मागवली होती. २ जून रोजी त्यांना मिळालेल्या उत्तरात विभागाने केवळ जुन्याच कायद्यांचा आणि

नियमांचा दाखला दिला आहे.

विभागाने आपल्या उत्तरात म्हटले आहे की, 'महाराष्ट्र राज्य महिला आयोग कायदा, १९९३' अंतर्गत राज्य सरकारला मिळालेल्या अधिकारांनुसार आयोगाच्या अध्यक्षा आणि इतर सहा अशासकीय सदस्यांची नियुक्ती केली जाते. मात्र, रिक्त पदे कधी भरली जाणार? या मूळ प्रश्नाला विभागाने बगल दिली आहे. केवळ 'कलम ३' आणि संबंधित तरतुदींचा उल्लेख करून विभागाने आपले हात वर केले आहेत.

२,७०० हून अधिक तक्रारी धूळ खात

मिळालेल्या माहितीनुसार, मागील आर्थिक वर्षाच्या अखेरीस महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकडे तब्बल २,७६१ तक्रारी प्रलंबित होत्या. वर्ष २०२५-२६ या कालावधीत आयोगाने १५,५६० प्रकरणांचा निपटारा केला असला, तरीही प्रलंबित

> *"माझ्या माहिती अधिकार अर्जाचा मुख्य उद्देश आयोगातील रिक्त पदे कोणती आहेत आणि या नियुया प्रत्यक्षात कधी होणार आहेत हे जाणून घेणे हा होता. मला नियुयांशी संबंधित नियमांची माहिती नको होती, तर प्रत्यक्ष कारवाईची तारीख हवी होती."*
> *–विहार दुर्वे, माहिती अधिकार कार्यकर्ते*

प्रकरणांचा आकडा अजूनही चिंताजनक आहे. यामध्ये कौटुंबिक आणि वैवाहिक वादांशी संबंधित प्रकरणांची संख्या सर्वाधिक असून, ही प्रकरणे अजूनही न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत.

माजी अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी २० मार्च रोजी आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. तसेच आयोगाच्या इतर अशासकीय सदस्यांचा कार्यकाळही जानेवारी महिन्यातच संपला आहे. तेव्हापासून राज्य सरकार नवीन अध्यक्षांची किंवा सदस्यांची नियुक्ती करू शकलेले नाही. अध्यक्ष आणि सदस्यांशिवाय आयोगाचे कामकाज पूर्ण क्षमतेने चालणे कठीण झाले आहे.

महिला हक्क कार्यकर्ते आणि सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी या परिस्थितीवर तीव्र चिंता व्यक्त केली आहे. वाढत्या तक्रारी आणि प्रलंबित प्रकरणांचा डोंगर पाहता, राज्य सरकारने महिला व बालविकास विभागाच्या माध्यमातून या नियुया तातडीने कराव्यात, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

कार्यकर्त्यांच्या मते, महिला आयोगाच्या अध्यक्ष आणि सदस्यपदी कोणत्याही राजकीय नेत्याचे किंवा कार्यकर्त्याचे राजकीय पुनर्वसन करण्याऐवजी, सामाजिक क्षेत्रातील कामाचा दांडगा अनुभव असलेल्या आणि महिलांच्या हक्कांसाठी लढणाऱ्या तज्ज्ञ व्यक्तींची नियुक्ती केली पाहिजे. यामुळे प्रकरणांचा निपटारा वेगाने होईल आणि पीडित महिलांना खऱ्या अर्थाने न्याय मिळू शकेल.

माहिती अधिकार कार्यकर्ते विहार दुर्वे यांनी सांगितले की, सरकारकडून मिळालेले उत्तर असमाधानकारक आणि मूळ मुद्द्याला बगल देणारे आहे. त्यामुळे ते या माहिती अधिकार अर्जाच्या उत्तराचा सखोल अभ्यास करत असून, आवश्यकतेनुसार माहिती अधिकार कायद्यांतर्गत प्रथम अपील दाखल करणार आहेत, जेणेकरून सरकारला नियुयांच्या निश्चित तारखेबाबत स्पष्टीकरण देणे भाग पडेल.

पुणे जिल्ह्यात 'मोबाईल लोकअदालत'!

प्रमुख जिल्हा न्यायाधीश ए. टी. वानखेडे यांचे नागरिकांना लाभ घेण्याचे आवाहन

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण आणि उच्च न्यायालय विधी सेवा समिती (मुंबई) यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे यांच्या वतीने ९ जून ते १७ जुलै २०२६ या कालावधीत पुणे जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये 'फिरते लोकअदालत' आणि विधी जनजागृती शिबिरांचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या अभिनव उपक्रमांतर्गत नागरिकांना थेट त्यांच्या गावातच मोफत कायदेशीर मार्गदर्शन, शासकीय योजनांची माहिती आणि प्रलंबित वादांवर सामंजस्याने तोडगा काढण्याची सुवर्णसंधी उपलब्ध होणार आहे.

थेट गावातच मिळणार न्याय आणि कायदेशीर हक्कांची माहिती

या उपक्रमाचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील जनतेला जलद, सुलभ आणि कमी खर्चात न्याय मिळवून देणे हा आहे. फिरत्या लोकअदालतीमध्ये दिवाणी, फौजदारी, कौटुंबिक वाद, मोटार अपघात भरपाई, बँक वसुली यांसारख्या तडजोडपात्र प्रकरणांचा निपटारा केला जाईल. तसेच, विधी जनजागृती शिबिरांच्या माध्यमातून महिला व बालकांचे हक्क, सायबर गुन्हे, व्यसनमुक्ती, सामाजिक न्याय विषयक कायदे आणि नागरिकांची कर्तव्ये यावर तज्ज्ञांद्वारे मार्गदर्शन केले जाणार आहे.

फिरते लोकअदालत व शिबिरांचे संपूर्ण वेळापत्रक:
खालील तयामध्ये दोन्ही उपक्रमांचे तारीख आणि ठिकाणनिहाय नियोजन दिले आहे:

दिनांक	तालुका	फिरते लोकअदालत (स्थळ)	विधी जनजागृती शिबीर (स्थळ)
०९ जून	पुणे	शिवाजीनगर, पुणे	शिवाजीनगर, पुणे
११ व १२ जून	जुन्नर	ढोलवड	ढोलवड
१५ व १६ जून	घोडेगाव	घोडेगाव	घोडेगाव
१८ व १९ जून	खेड	खेड	खेड
२२ व २३ जून	वडगाव मावळ	कामशेत	उर्से
२५ व २६ जून	शिरूर	करडे	निमोणे
०१ व ०२ जुलै	दौंड	देवुळगाव राजे	कुरकुंभ
०४ व ०५ जुलै	इंदापूर	इंदापूर	निमगाव केतकी
०८ व ०९ जुलै	बारामती	बारामती	मेदद ग्रामपंचायत
१३ व १४ जुलै	सासवड	दिवाणी न्यायालय, सासवड	दिवाणी न्यायालय, सासवड
१५ व १६ जुलै	भोर	धानगवडी, भोर	धानगवडी, भोर
१७ जुलै	पुणे	शिवाजीनगर, पुणे	शिवाजीनगर, पुणे

> "ग्रामीण भागातील नागरिकांनी कोर्टकचेऱ्यांच्या फेऱ्या टाळण्यासाठी या फिरत्या लोकअदालतीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा आणि आपले प्रलंबित वाद सामंजस्याने मिटवून घ्यावेत."
> **-श्री. ए. टी. वानखेडे** (प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे)

> "नागरिकांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देणे आणि दारात न्याय पोहोचवणे हा या मोहिमेचा उद्देश आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे."
> **-श्रीमती रेवती आर. देशपांडे** (सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे)

पीडित कुटुंबाला २२ लाखांची भरपाई!

येरवडा मनोरुग्णालयातील हल्ल्यात रुग्णाचा मृत्यू ; मुंबई उच्च न्यायालयाचे कडक ताशेरे

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

पुण्यातील येरवडा येथील प्रादेशिक मानसिक रुग्णालयात मानसिक आजारावर उपचारासाठी दाखल झालेल्या एका निष्पाप रुग्णाचा, तिथल्याच दुसऱ्या एका अत्यंत हिंसक रुग्णाने केलेल्या जीवघेण्या हल्ल्यात मृत्यू झाला. या संपूर्ण प्रकरणाची गंभीर दखल घेत मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारवर अत्यंत कडक शब्दांत ताशेरे ओढले आहेत. न्यायालयाने स्पष्ट केले की, रुग्णालयात दाखल असलेल्या प्रत्येक रुग्णाच्या सुरक्षिततेची संपूर्ण आणि अंतिम जबाबदारी ही राज्य सरकारचीच असते. सरकार आणि रुग्णालय प्रशासन ही जबाबदारी पार पाडण्यात पूर्णपणे अपयशी ठरल्याचे निरीक्षण नोंदवत, न्यायालयाने मृताच्या पत्नीला आणि मुलांना २२ लाख रुपयांची नुकसानभरपाई देण्याचे आदेश राज्य सरकारला दिले आहेत. हा ऐतिहासिक निर्णय न्यायमूर्ती मनीष पितळे आणि न्यायमूर्ती श्रीराम व्ही. शिरसाट यांच्या खंडपीठाने सुनावला आहे.

या घटनेची पार्श्वभूमी पाहिली तर हे प्रकरण २०१३ मधील आहे. नूरजान भानवडिया यांच्या पतीला स्किझोफ्रेनिया या गंभीर मानसिक आजारावरील उपचारासाठी १९ नोव्हेंबर २०१३ रोजी येरवडा मानसिक रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, रुग्णालयात दाखल केल्यानंतर अवघ्या दोनच दिवसांत, म्हणजेच २१ नोव्हेंबर रोजी एका हिंसक प्रवृत्तीच्या रुग्णाने त्यांच्यावर आणि रुग्णालयातील आणखी एका रुग्णावर अचानक

हल्ला केला. हा हल्ला इतका भीषण होता की, यात दोन्ही रुग्णांचा जागीच मृत्यू झाला. मृत्यूनंतर करण्यात आलेल्या शवविच्छेदन अहवालात (पोस्टमार्टम) धक्कादायक बाबी समोर आल्या. त्या दोन्ही रुग्णांच्या डोक्यावर गंभीर दुखापती झाल्या होत्या आणि गळा दाबल्यामुळे त्यांचा गुदमरून मृत्यू झाल्याचे वैद्यकीय अहवालात स्पष्टपणे नमूद करण्यात आले होते. आपल्या माणसाला बरे करण्यासाठी रुग्णालयात पाठवले आणि तिथून त्यांचा मृतदेहच परत आल्यामुळे भानवडिया कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला होता. शेवटी या अन्यायाविरोधात त्यांनी न्यायालयाचे दार ठोठावले.

या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान रुग्णालयातील अनागोंदी कारभाराचे अत्यंत विदारक चित्र न्यायालयासमोर आले. न्यायालयाने रुग्णालय प्रशासनाला विचारणा केली असता, घटनेच्या रात्री पाळल्या गेलेल्या नियमांची गंभीर त्रुटी समोर आली. ज्या रात्री ही दुर्दैवी घटना घडली, त्या रात्री वॉर्डमध्ये तब्बल ७२ रुग्ण दाखल होते. नियमांनुसार, मानसिक रुग्णालयात दर पाच रुग्णांमागे किमान एक परिचर (वॉर्ड बॉय) असणे कायदेशीररित्या बंधनकारक आहे. म्हणजेच, ७२ रुग्णांच्या देखरेखीसाठी तिथे किमान १४ ते १५ परिचर असणे आवश्यक होते. परंतु, प्रत्यक्षात त्या रात्री केवळ तीनच परिचर कर्तव्यावर हजर होते. ही व्यवस्था अत्यंत अपुरी, बेजबाबदार आणि पूर्णपणे नियमबाह्य होती, असे ताशेरे न्यायालयाने ओढले. याशिवाय, ज्या रुग्णाची प्रवृत्ती हिंसक आहे आणि जो इतरांना इजा पोहचवू शकतो, अशा रुग्णाला इतर सामान्य रुग्णांपासून वेगळे ठेवणे (आयसोलेशन किंवा विशेष देखरेख) गरजेचे होते, मात्र यातही रुग्णालय प्रशासन पूर्णपणे अपयशी ठरले.

न्यायालयाने म्हटले की, "हा केवळ साधा निष्काळजीपणा नसून, हा अत्यंत 'गंभीर स्वरूपाचा निष्काळजीपणा' आहे." एखाद्या सरकारी संस्थेत उपचारासाठी आलेल्या व्यक्तीचा अशा प्रकारे मृत्यू होणे हे प्रशासनाचे मोठे अपयश आहे. पीडित कुटुंबाचे झालेले नुकसान कधीही भरून न येणारे आहे, त्यामुळे त्यांना योग्य न्याय मिळणे गरजेचे होते. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती आणि भविष्यातील आधार विचारात घेऊन, न्यायालयाने भरपाईची रक्कम निश्चित करण्यासाठी एक वेगळा मार्ग निवडला. सामान्यतः मोटार वाहन अपघातात वापरली जाणारी 'मल्टिप्लायर पद्धत' (कमावती व्यक्ती गेल्यामुळे कुटुंबाचे होणारे आर्थिक नुकसान मोजण्याची पद्धत) न्यायालयाने या प्रकरणात वापरली आणि २२ लाखांची भरपाई निश्चित केली.

दुसरीकडे, राज्य सरकारने यावर आपला बचाव करताना न्यायालयासमोर असा युक्तिवाद केला की, शासनाच्या 'महाराष्ट्र पीडित भरपाई योजनेनुसार' गुन्ह्यातील मृत्यूसाठी केवळ २ लाख रुपये देण्याची तरतूद आहे. तसेच, २०२५ च्या नव्या शासन निर्णयानुसार कोठडीतील मृत्यूसाठी ५ लाख रुपयांची भरपाई निश्चित करण्यात आली आहे. त्यामुळे सरकार या नियमांच्या पलीकडे जाऊन मोठी रक्कम देऊ शकत नाही. मात्र, मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारचा हा तांत्रिक युक्तिवाद साफ फेटाळून लावला.

न्यायालयाने स्पष्ट शब्दांत सुनावले की, शासकीय योजनांमधील या रकमा 'अत्यंत अपुऱ्या' आहेत. मानसिक रुग्णालयातील रुग्णाचा हिंसक मृत्यू होणे ही एक अत्यंत वेगळी आणि गंभीर परिस्थिती आहे. अशा संवेदनशील प्रकरणात केवळ शासकीय नियमांचा दाखला देऊन मर्यादित किंवा तुटपुंजी रक्कम देणे हे पीडित कुटुंबावर अत्यंत अन्यायकारक ठरेल. त्यामुळे न्यायालयाने सरकारला तात्काळ २२ लाख रुपये देण्याचे आदेश दिले. हा निर्णय सरकारी रुग्णालयांच्या सुरक्षिततेवर आणि तिथल्या कर्मचाऱ्यांच्या अपुऱ्या संख्येवर बोट ठेवणारा ठरला आहे.

सलमान खानची आक्षेपार्ह पोस्ट हटवा!

हायकोर्टाचे शेजाऱ्याला निर्देश, सोशल मीडियाचा ॲक्सेस मिळाला म्हणजे कोणाचीही बदनामी करण्याचा अधिकार मिळत नाही

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

बॉलीवूड अभिनेता सलमान खान याच्या पनवेल येथील फार्महाऊसच्या शेजाऱ्याने सोशल मीडियावर अपलोड केलेले कथित मानहानिकारक व्हिडिओ आणि पोस्ट हटवण्याबाबत गांभीर्याने विचार करावा, असे महत्त्वपूर्ण तोंडी निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. "सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा वापर करता येतो म्हणजे नागरिकांना किंवा व्यक्तींना इतरांची, मग ती सामान्य खाजगी व्यक्ती असो वा सेलिब्रेटी, बदनामी करणारा मजकूर प्रसिद्ध करण्याचा परवाना मिळत नाही," अशा कडक शब्दांत उच्च न्यायालयाने सुनावले आहे. या वादावर दोन्ही बाजूंनी आपापसात सामोपचाराने तोडगा काढावा, अशी सूचनाही न्यायालयाने केली आहे.

अभिनेता सलमान खान याने त्याचे शेजारी केतन कक्कड यांच्या विरोधात दिवाणी न्यायालयात मानहानीचा खटला दाखल केला होता. कनिष्ठ न्यायालयाने सलमानला अंतरिम दिलासा देण्यास नकार दिल्यानंतर, त्याने या निर्णयाविरोधात मुंबई उच्च न्यायालयात अपील दाखल केले आहे. न्यायमूर्ती शर्मिला देशमुख यांच्या एकलपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी पार पडली. सुनावणी दरम्यान न्यायालयाने स्पष्ट केले की, वादात अडकलेल्या दोन्ही पक्षांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून परस्परांवर चिखलफेक करणे टाळले पाहिजे आणि योग्य त्या कायदेशीर मार्गांचा अवलंब केला पाहिजे.

न्यायमूर्ती शर्मिला देशमुख यांनी सुनावणी दरम्यान तीव्र नाराजी व्यक्त करत सांगितले की, न्यायालयाचा मौल्यवान वेळ अशा बाबींवर खर्च होऊ नये. संबंधित व्हिडिओ किंवा बदनामीकारक मजकूर ऑनलाइन राहिला पाहिजे की नाही, हे ठरवण्यात न्यायालयाचा वेळ जाण्यापेक्षा दोन्ही पक्षांनी सामोपचाराने प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करावा. सोशल मीडियावर सातत्याने अशा प्रकारचा मजकूर फिरत राहण्यावर न्यायालयाने चिंता व्यक्त केली.

सलमान खानच्या वतीने न्यायालयात बाजू मांडताना वकील चिराग शाह आणि पराग खांडहार यांनी सांगितले की, केतन कक्कड यांनी सोशल मीडियावर व्हिडिओ आणि पोस्ट टाकून सलमान खान आणि त्याच्या कुटुंबाविरुद्ध अत्यंत आक्षेपार्ह आणि बदनामीकारक वक्तव्ये केली आहेत. या कथित विधानांमुळे सलमान खानच्या प्रतिष्ठेला आणि त्याच्या कुटुंबाला 'गंभीर आणि पूर्वग्रहदूषित' विचारसरणीमुळे नुकसान सोसावे लागत आहे. त्यामुळे हे व्हिडिओ त्वरित हटवण्याची मागणी त्यांनी केली.

दुसरीकडे, केतन कक्कड यांच्या वतीने सांगण्यात आले की, यातील काही पोस्ट या अनोळखी किंवा इतर त्रयस्थ व्यक्तींनी (THIRD PARTIES) केलेल्या आहेत. त्यावर न्यायालयाने नमूद केले की, जरी या पोस्ट त्रयस्थ पक्षांच्या असल्या, तरी सोशल मीडिया इंटरमीडियरीजच्या माध्यमातून त्या हटवण्यासाठी आवश्यक पावले उचलली जाऊ शकतात.

न्यायालयाने या प्रकरणाची पुढील सुनावणी ६ जुलै रोजी निश्चित केली असून, तोपर्यंत दोन्ही बाजूंना सामोपचाराने मार्ग काढण्याचा सल्ला दिला आहे. या प्रकरणाकडे आता संपूर्ण बॉलीवूड आणि सोशल मीडिया जगताचे लक्ष लागले आहे.

पतीची मारेकरी आईकडे १२ वर्षीय मुलीचा ताबा

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

पतीच्या खून प्रकरणातील खटल्याला सामोरे जात असलेल्या एका आईकडे तिच्या १२ वर्षांच्या मुलीचा ताबा मुंबई उच्च न्यायालयाने मंगळवारी सुपूर्द केला. "मुलांचे कल्याण आणि त्यांचे हित हाच न्यायालयासाठी सर्वोच्च विचार असला पाहिजे," असे महत्त्वपूर्ण निरीक्षण न्यायालयाने हा निर्णय देताना नोंदवले. सदर मुलगी ही केवळ एका कथित लैंगिक अत्याचार प्रकरणातील पीडित नसून, तिच्या वडिलांच्या खून प्रकरणातील एक मुख्य साक्षीदारही आहे. या अत्यंत संवेदनशील परिस्थितीचा विचार करून न्यायालयाने हा निर्णय घेतला आहे.

पतीच्या कथित खून प्रकरणात अटक झालेल्या एका महिलेची नंतर जामिनावर सुटका झाली होती. तिने आपल्या मोठ्या मुलीचा ताबा मिळावा यासाठी न्यायालयात धाव घेतली होती. या महिलेच्या दोन लहान मुलांचा ताबा आधीच तिच्याकडे सोपवण्यात आला होता, मात्र मोठी मुलगी तिच्या वडिलांच्या नातेवाईकांकडे राहत होती. या दरम्यान, नातेवाईकांकडे राहत असताना मुलीवर तिच्या सख्ख्या चुलत्याने लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आईने केला. याप्रकरणी फौजदारी गुन्हाही दाखल करण्यात आला आहे. "या धक्कादायक प्रसंगानंतर मुलीला तिच्या आईच्या भावनिक आधाराची आणि संरक्षणाची अत्यंत गरज आहे," असा युक्तिवाद आईच्या वतीने करण्यात आला.

दुसरीकडे, वडिलांच्या खून प्रकरणात

'मुलीचे कल्याण' हाच सर्वोच्च विचार

ही मुलगी तिच्या स्वतःच्या आईविरुद्ध एक मुख्य साक्षीदार असल्याने, तिला आईकडे सोपवण्यास नातेवाईकांकडून तीव्र विरोध करण्यात आला होता.

न्यायमूर्ती सारंग कोतवाल आणि न्यायमूर्ती आशिष चव्हाण यांच्या खंडपीठाने या संपूर्ण प्रकरणाची आणि परिस्थितीची सखोल तपासणी केली. सुनावणी दरम्यान, "मला माझ्या आईसोबतच राहायचे आहे," अशी इच्छा स्वतः १२ वर्षीय मुलीने न्यायालयासमोर व्यक्त केली.

वडिलांच्या नातेवाईकांकडे राहत असताना मुलीसोबत घडलेल्या कथित लैंगिक अत्याचाराच्या घटनेची गंभीर दखल खंडपीठाने घेतली. न्यायालयाने स्पष्ट केले की, अशा कठीण प्रसंगात मुलीला मानसिक आधाराची गरज असून "तिच्या मानसिक स्वास्थ्यासाठी आणि चांगल्या भविष्यासाठी ती आईसोबत राहणेच तिच्या हिताचे ठरेल."

न्यायालयाने पुढे असेही नमूद केले की, मुलगी या खून खटल्यात साक्षीदार असली, तरी आईने तिच्याशी संपर्क साधण्यासाठी आपल्या जामीन अटींमध्ये रीतसर सुधारणा करून घेतली आहे. त्यामुळे कायद्याची कोणतीही अडचण येत नाही.

बालकाच्या कल्याणाला आणि सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत, मुंबई उच्च न्यायालयाने या अल्पवयीन मुलीचा ताबा तात्काळ तिच्या आईकडे सोपवण्याचे आदेश दिले आहेत.

बॅरिस्टर बनायचे आहे ?

लंडनमध्ये बॅरिस्टर बनण्याचे स्वप्न पाहत असाल, तर हा प्रवास आव्हानात्मक असला तरी योग्य नियोजनाने नक्कीच पूर्ण केला जाऊ शकतो

भारतातील कायद्याचे शिक्षण पूर्ण करणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांचे एक मोठे स्वप्न असते ते म्हणजे लंडनमध्ये जाऊन 'बॅरिस्टर' (Barrister) होणे. इंग्लंड आणि वेल्सची न्यायव्यवस्था ही जगातील सर्वात जुन्या आणि प्रतिष्ठित न्यायव्यवस्थांपैकी एक मानली जाते. भारतातील 'ॲडव्होकेट' आणि लंडनचा 'बॅरिस्टर' यात काही मूलभूत फरक आहेत, आणि तिथे वकिली करण्याचा प्रवास हा केवळ अभ्यासावर अवलंबून नसून तो एक शिस्तबद्ध अनुभव आहे. जर तुम्ही हे ध्येय निश्चित केले असेल, तर त्याचा संपूर्ण आराखडा खालीलप्रमाणे आहे.

बॅरिस्टर आणि सॉलिसिटर: मूलभूत फरक

लंडनमध्ये वकिली व्यवसायाची विभागणी दोन मुख्य भागांत केली जाते. हे समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे:

सॉलिसिटर (Solicitor): हे प्रामुख्याने क्लायंटशी थेट संवाद साधतात, केसचा पाया रचतात, कायदेशीर कागदपत्रे तयार करतात आणि सल्ला देतात.

बॅरिस्टर (Barrister):** हे प्रामुख्याने 'कोर्टात' युक्तिवाद करण्यासाठी ओळखले जातात. त्यांचे मुख्य काम म्हणजे कोर्टात केस लढणे आणि केसच्या कायदेशीर बाजूंचे विश्लेषण करणे. त्यांना 'इन्स ऑफ कोर्ट'कडून मान्यता मिळते, जे त्यांना 'कॉल टू द बार' करण्याचा अधिकार देतात.

शैक्षणिक प्रवास: पदवीपासून पात्रतेपर्यंत:

भारतातून लॉ पदवी (LLB) पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांसाठी लंडनचा मार्ग थेट नसला तरी अशक्य नाही.

पदवीचे मूल्यमापन : सर्वप्रथम, तुम्हाला 'बार स्टँडर्ड्स बोर्ड' BSB) कडे तुमच्या भारतीय पदवीचे मूल्यमापन करून घ्यावे लागते. तुमची पदवी इंग्लंडमधील 'क्वालिफायिंग लॉ डिग्री' च्या समकक्ष आहे का, हे पाहिले जाते.

लॉ कन्व्हर्जन कोर्स : जर तुमची पदवी पूर्णपणे समकक्ष नसेल, तर तुम्हाला एक वर्षाचा 'ग्रॅज्युएट डिप्लोमा इन लॉ' GDL) किंवा 'सी पी ई' (कॉमन प्रोफेशनल एक्झॅम) पूर्ण करावा लागतो. यालाच 'लॉ कन्व्हर्जन कोर्स' म्हणतात, जो तुम्हाला ब्रिटीश कायद्याची पायाभूत माहिती देतो.

व्यावसायिक प्रशिक्षण: द बार कोर्स:

एकदा का तुम्ही शैक्षणिक पात्रता पूर्ण केली की, तुम्ही व्यावसायिक टप्प्यावर पोहोचता. पूर्वी याला 'बी पी टी सी' (BPTC) म्हटले जायचे, आता याला 'बार कोर्स' म्हणून ओळखले जाते.

प्रवेश परीक्षा: यासाठी तुम्हाला 'बार कोर्स ॲप्टिट्यूड टेस्ट' BCAT) ही प्रवेश परीक्षा उत्तीर्ण करावी लागते.

भाषा प्रभुत्व: लंडनच्या कोर्टात युक्तिवाद करण्यासाठी तुमची इंग्रजी भाषेवरची पकड अफाट असावी लागते. यासाठी 'आयईएलटीएस' (IELTS) परीक्षेत प्रत्येक विभागात किमान ७.५ किंवा ८ बँड असणे अनिवार्य आहे.

कोर्सचे स्वरूप: या १ वर्षाच्या कोर्समध्ये तुम्हाला 'ॲडव्होकसी' , 'उलटतपासणी' , 'कायदेशीर मसुदा लेखन' आणि 'व्यावसायिक नीतिमत्ता' याचे सखोल प्रशिक्षण दिले जाते.

इन्स ऑफ कोर्ट: परंपरेचा मान

बार कोर्स सुरू करण्यापूर्वी, तुम्हाला लंडनच्या चार ऐतिहासिक 'इन्स ऑफ कोर्ट' पैकी एकाचे सदस्य व्हावे लागते:

१. ग्रेज इन (Gray's Inn)
२. लिंकन्स इन (Lincoln's Inn)
३. इनर टेम्पल (Inner Temple)
४. मिडल टेम्पल (Middle Temple)

येथे तुम्हाला १२ 'क्वालिफायिंग इव्हेंट्स' पूर्ण करावे लागतात. हे इव्हेंट्स म्हणजे केवळ जेवण किंवा चर्चा नसून, हा एक संस्कार आहे जो तुम्हाला बॅरिस्टर म्हणून घडवतो.

प्युपिलेज: सर्वात मोठे आव्हान

बार कोर्स यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर तुम्हाला 'कॉल टू द बार' मिळते, पण खरी प्रॅक्टिस सुरू करण्यासाठी तुम्हाला 'प्युपिलेज' मिळवणे गरजेचे असते.

हे एक वर्षाचे 'ऑन-द-जॉब' सशुल्क प्रशिक्षण असते.

हे प्रशिक्षण एखाद्या नामांकित बॅरिस्टरच्या 'चेंबर्स' मध्ये घ्यावे लागते.

प्युपिलेजचे दोन भाग: पहिले ६ महिने 'नॉन-प्रॅक्टिसिंग' असतात, ज्यात तुम्ही सीनियर बॅरिस्टरच्या कामाचे निरीक्षण करता. पुढचे ६ महिने 'प्रॅक्टिसिंग' असतात, ज्यात तुम्ही स्वतः कोर्टात केस लढू शकता. प्युपिलेजच्या जागा अत्यंत कमी असल्याने जागतिक स्तरावर इथे तीव्र स्पर्धा असते.

आर्थिक नियोजन आणि शिष्यवृत्ती

लंडनमध्ये बॅरिस्टर बनण्याचा प्रवास आर्थिकदृष्ट्या महागडा आहे. बार कोर्स फी आणि राहण्याचा खर्च मिळून अंदाजे २५ ते ४० लाख रुपये खर्च येऊ शकतो.

शिष्यवृत्ती : सुदैवाने, चारही 'इन्स ऑफ कोर्ट' दरवर्षी लाखो पौंड्सची शिष्यवृत्ती देतात. जर तुमची शैक्षणिक कामगिरी उत्तम असेल, तर तुम्ही या शिष्यवृत्तीसाठी नक्कीच प्रयत्न करू शकता. यामुळे तुमचा आर्थिक भार बराच हलका होऊ शकतो.

यशस्वी होण्यासाठी विशेष टिप्स

मूटिंग (Mooting): तुमच्या लॉ कॉलेजच्या दिवसांपासूनच 'मूट कोर्ट' स्पर्धांमध्ये भाग घ्या. यामुळे तुमचा आत्मविश्वास वाढेल.

मिनी-प्युपिलेज (Mini-Pupillages): लंडनमध्ये शिक्षण सुरू असताना विविध 'चेंबर्स'मध्ये जाऊन १-२ आठवड्यांची इंटर्नशिप करा. यामुळे तुम्हाला तिथल्या कामाची पद्धत समजेल. नेटवर्किंग (Networking): कायदेशीर क्षेत्रात तुमचे नेटवर्किंग जेवढे चांगले, तितक्या लवकर तुम्हाला प्युपिलेजचे मार्ग खुले होतील.

व्हिसा नियोजन: शिक्षण संपल्यानंतर 'ग्रॅज्युएट रूट व्हिसा' चा वापर करून तिथे राहून प्युपिलेज शोधणे सोयीचे पडते. लंडनमध्ये बॅरिस्टर होणे हे केवळ एक करिअर नाही, तर तो एक 'अनुभव' आहे. यासाठी प्रचंड चिकाटी, संयम आणि सातत्याची गरज आहे. हा प्रवास कठीण असला तरी अशक्य नाही. जर तुम्ही भारताच्या कायद्याच्या वर्गातून सुरुवात करून लंडनच्या रॉयल कोर्ट्स ऑफ जस्टिसमध्ये आपला काळा कोट आणि पांढरा कॉलर घालून उभे राहण्याचे स्वप्न पाहिले असेल, तर ते पूर्ण करण्यासाठी आजच तयारीला लागा. योग्य दिशा आणि जिद्द असेल, तर तुम्ही नक्कीच यशस्वी व्हाल.

सॉलिसीटर रामशास्त्री

राज्य शासनाला १६ लाखांचा दंड!

निष्काळजीपणामुळे गरोदर महिलेचा मृत्यू; डॉक्टरवर शिस्तभंगविषयक कारवाईचे आदेश

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

राज्यातील ग्रामीण आरोग्य व्यवस्थेचे विदारक चित्र आणि प्रशासकीय अनास्था पुन्हा एकदा चव्हाट्यावर आली आहे. नंदुरबार जिल्ह्यातील एका अवघ्या २३ वर्षीय गरोदर महिलेचा केवळ वेळेवर रुग्णवाहिका न मिळणे, प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टर उपलब्ध नसणे आणि मोडकळीस आलेली वैद्यकीय पायाभूत सुविधा यांमुळे दुर्दैवी मृत्यू झाला. या अत्यंत गंभीर प्रकरणाची दखल घेत महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाने (MSHRC) राज्य सरकारला तीव्र फटकारले असून, पीडित कुटुंबाला १६ लाख रुपयांची भरपाई देण्याचे आदेश दिले आहेत. तसेच, या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या आणि कर्तव्यावरून वेळेआधीच पळ काढणाऱ्या संबंधित डॉक्टरवर कडक शिस्तभंगविषयक कारवाई करण्याचे निर्देशही दिले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, सन २०२४ मध्ये नंदुरबार जिल्ह्यातील रहिवासी असलेल्या कविता राऊत (वय २३ वर्ष) या गरोदर महिलेला प्रसूती कळा येऊ लागल्या. तिच्या कुटुंबाने तातडीने सरकारी रुग्णवाहिकेसाठी संपर्क साधला, मात्र शासकीय यंत्रणेकडून कोणतीही रुग्णवाहिका उपलब्ध होऊ शकली नाही. अखेर हताश झालेल्या कुटुंबीयांनी खाजगी वाहनाने किंवा इतर मार्गाने तिला जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात (PHC) नेले. परंतु, दुर्दैवाचा फेरा इथेच थांबला नाही. त्या प्राथमिक आरोग्य केंद्रात एकही डॉक्टर कर्तव्यावर हजर नव्हता. तेथील कनिष्ठ कर्मचाऱ्यांनी परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे पाहून तिला पुढील उपचारासाठी मोठ्या रुग्णालयात नेण्याचा सल्ला दिला आणि एका रुग्णवाहिकेतून रवाना केले. मात्र, ती रुग्णवाहिका वाटेतच अचानक नादुरुस्त झाली. दुसरी रुग्णवाहिका मिळेपर्यंत प्रचंड वेळ वाया गेला. याच दरम्यान कविताने वाटेतच बाळाला जन्म दिला, मात्र प्रसूतीनंतर तिला तीव्र रक्तस्राव सुरू झाला. दुसऱ्या रुग्णालयात पोहोचल्यावर तेथील डॉक्टरांनी तिची गंभीर अवस्था पाहून तिला अजून एका मोठ्या केंद्रात नेण्यास सांगितले, मात्र दुर्दैवाने रुग्णालयांच्या या फेऱ्यात आणि प्रवासादरम्यानच कविताने दम तोडला.

मानवाधिकार आयोगाचे ताशेरे आणि आदेश

या धक्कादायक प्रकरणाची संपूर्ण सुनावणी मानवाधिकार आयोगाचे सदस्य संजय कुमार (निवृत्त आयपीएस अधिकारी) यांच्यासमोर झाली. सर्व बाजू तपासून त्यांनी निष्कर्ष काढला की, "कविता राऊत हिचा मृत्यू हा केवळ नैसर्गिक नसून, तो सरकारी रुग्णालयांमधील पराकोटीचा निष्काळजीपणा, डॉक्टरांची उदासीनता, कर्मचाऱ्यांचा अभाव आणि निकृष्ट दर्जाच्या आरोग्य सुविधांमुळे झाला आहे."

आयोगाने पीडित कुटुंबाला न्याय देताना खालीलप्रमाणे महत्त्वपूर्ण आदेश दिले आहेत. राज्य शासनाने पीडित महिलेच्या वारसांना एकूण १६ लाख रुपयांची भरपाई द्यावी. या भरपाईच्या रकमेतील ५०% रक्कम (८ लाख रुपये) त्या अनाथ झालेल्या बालकाच्या नावावर राष्ट्रीयीकृत बँकेत मुदत ठेव म्हणून ठेवली जावी, जेणेकरून त्या मुलाचे भविष्य सुरक्षित राहील.

आयोगासमोर झालेल्या सुनावणीदरम्यान जिल्हा आरोग्य अधिकारी आणि जिल्हा शल्यचिकित्सक यांनी सादर केलेला अहवाल ग्रामीण रुग्णालय मोलगी येथील डॉक्टरांच्या उपस्थितीबाबत पूर्णपणे मौन बाळगून होता. तिथे नेमके कोणी उपचार केले, हे स्पष्ट होत नव्हते. यावर आयोगाने तीव्र नाराजी व्यक्त करत म्हटले की, जिल्हा आरोग्य अधिकारी आणि शल्यचिकित्सक हे वस्तुस्थिती समोर आणण्याऐवजी आपल्याच 'वैद्यकीय अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना' वाचवण्याचा अधिक प्रयत्न करत असल्याचे दिसून येत आहे.

संपूर्ण प्रकरणात नंदुरबार जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी आयोगासमोर एक धक्कादायक सत्य मान्य केले. ज्या दिवशी ही घटना घडली, त्या दिवशी संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्रातील कार्यरत कम्युनिटी हेल्थ ऑफिसर (डॉक्टर) हे वेळेआधीच केंद्र सोडून निघून गेले होते. जर ते वेळेवर हजर असते, तर कविताला योग्य प्राथमिक उपचार मिळून तिचे प्राण वाचू शकले असते. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, या कर्तव्यात कसूर करणाऱ्या डॉक्टरवर कडक शिस्तभंगविषयक कारवाई केली जात आहे. तसेच, 'पिंपळाखुटा प्राथमिक आरोग्य केंद्रात' वैद्यकीय अधिकाऱ्यांची दोन पदे रिक्त असून, तदर्थ (Ad-hoc) भरती प्रक्रियेला वेळ लागत असल्याचेही त्यांनी सांगितले. ग्रामीण भागातील गरिबांना हक्काची आरोग्य सेवा मिळवून देण्यात शासकीय यंत्रणा कशी अपयशी ठरत आहे, याचे हे जिवंत आणि तितकेच वेदनादायी उदाहरण आहे. आयोगाच्या या दणक्यामुळे आतातरी आरोग्य प्रशासन सुधारेल का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

'अत्यंत जड अंतःकरणाने' बलात्कार-हत्येतील आरोपीला जामीन

"अत्यंत जड अंतःकरण आणि तीव्र वेदनेने", अलाहाबाद उच्च न्यायालयाने नुकताच एका बलात्कार आणि हत्येच्या प्रकरणातील आरोपीला जामीन मंजूर केला. आरोपीला गुन्ह्याशी जोडणाऱ्या ठोस वैज्ञानिक पुराव्यांचा अभाव असल्याबद्दल न्यायालयाने खंत व्यक्त केली, तसेच उत्तर प्रदेशातील फॉरेन्सिक सायन्स प्रयोगशाळांच्या (FSL) अपुऱ्या पायाभूत सुविधा आणि कामकाजावर तीव्र चिंता व्यक्त केली.

२१ मे रोजी आरोपी मनोज याला जामीन मंजूर करताना न्यायमूर्ती अरुण कुमार सिंह देशवाल यांच्या खंडपीठाने म्हटले की, "फॉरेन्सिक सायन्स लॅबोरेटरी (FSL) मधील जुनाट यंत्रसामग्री आणि अपूर्ण पायाभूत सुविधा हेच डीएनए प्रोफाइल (DNA profile) तयार न होण्याचे मुख्य कारण आहे. मूलभूत पायाभूत सुविधा पुरवण्याऐवजी इतर अनेक विषयांना प्राधान्य देणाऱ्या राज्य सरकारशिवाय यासाठी इतर कोणालाही दोष दिला जाऊ शकत नाही." सरकारी पक्षाच्या दाव्यानुसार, २०२५ मध्ये एटा (Etah) येथील एक महिला नदीजवळ मृत अवस्थेत आढळली होती. एका प्रत्यक्षदर्शीने आरोपी मनोजला घटनास्थळाच्या दिशेने जाताना आणि ओल्या कपड्यांमध्ये परतताना पाहिल्याचा दावा केला होता. तसेच पोलिसांच्या म्हणण्यानुसार, मनोजच्या सांगण्यावरून पीडितेचे मनगटी घड्याळ जप्त करण्यात आले होते.

सुरुवातीला या प्रकरणात बलात्कार आणि हत्येचा एफआयआर (FIR) नोंदवण्यात आला होता. त्यानंतर, एका कथित प्रत्यक्षदर्शींच्या उशिरा नोंदवलेल्या जबाबाच्या आधारे मनोजला या प्रकरणात आरोपी करण्यात आले.

आरोपीच्या वकिलांनी युक्तिवाद केला की, मनोजच्या सांगण्यावरून खुल्या जागेतून घड्याळ जप्त करणे, हा त्याच्याविरुद्धचा निर्णायक पुरावा मानला जाऊ शकत नाही. तसेच, फॉरेन्सिक (FSL) अहवालानुसार, मृत महिलेच्या व्हजायनल स्मिअर (vaginal smear) मध्ये सापडलेला डीएनए आणि आरोपीचा डीएनए जुळलेला नाही.

बदाम खरेदीत ८२ रुपयांची फसवणूक; ग्राहक न्यायालयाचा मॉलला ७,००० रुपयांचा दणका!

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

ग्राहक हक्कांच्या संरक्षणासाठी ग्राहक मंचाने पुन्हा एकदा एक मोठा आणि दिशादर्शक निर्णय दिला आहे. छापील किमतीपेक्षा (MRP) जास्त पैसे आकारणाऱ्या एका मोठ्या रिटेल मॉलमधून ग्राहकाची झालेली फसवणूक न्यायालयाच्या मदतीने दूर झाली आहे. केवळ १०० ग्रॅम बदाम खरेदी करताना ८२ रुपये जादा वसूल केल्याप्रकरणी ग्राहक न्यायालयाने संबंधित रिटेल कंपनीला ७,००० रुपयांचा दंड ठोठावला असून, जादा घेतलेली रक्कम व्याजासह परत करण्याचे आदेश दिले आहेत.

आंध्र प्रदेशातील प्रकाशम जिल्ह्यातील ही घटना आहे. तक्रारदार ग्राहकाने ७ फेब्रुवारी २०२५ रोजी 'मोअर रिटेल प्रायव्हेट लिमिटेड' या नामांकित मॉलमधून किराणा सामानाची खरेदी केली होती. यामध्ये त्यांनी १०० ग्रॅम वजनाचे 'मोअर चॉईस बदाम मामरा' चे एक पाकीट खरेदी केले. या पाकिटावर कमाल किरकोळ किंमत म्हणजेच एमआरपी (MRP) १९० रुपये छापलेली होती. मात्र, मॉलने बिलामध्ये या बदामासाठी चक्क २७२ रुपये आकारले. म्हणजेच नियमांचे उल्लंघन करून ग्राहकाकडून ८२ रुपये जादा वसूल करण्यात आले.

आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच जागरूक ग्राहकाने आधी मॉल प्रशासनाला कायदेशीर नोटीस बजावली. मात्र, कंपनीकडून समाधानकारक प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी जिल्हा ग्राहक विवाद निवारण मंचाकडे धाव घेतली आणि सेवेतील कमतरता व गैरवाजवी व्यापारी पद्धतींविरोधात दाद मागितली.

मॉलचा अजब युक्तिवाद

या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान मोअर रिटेल कंपनीने स्वतःचा बचाव करण्याचा प्रयत्न केला. कंपनीने न्यायालयात सांगितले की, "संबंधित ग्राहकाने एकूण १,५६४ रुपयांच्या ७ वस्तू खरेदी केल्या होत्या. त्यावर त्यांना ४४० रुपयांची सूट (Discount) आणि लॉयल्टी पॉइंट्स देण्यात आले होते, ज्यामुळे त्यांचे अंतिम बिल १,१२४ रुपये झाले होते." मॉलने असा दावा केला की त्यांनी ग्राहकाकडून बिलापेक्षा जास्त पैसे घेतले नाहीत आणि केवळ विनाकारण त्रास देऊन पैसे उकळण्याच्या उद्देशाने ग्राहकाने ही तक्रार दाखल केली आहे. त्यामुळे ही तक्रार फेटाळण्यात यावी.

मंचाच्या अध्यक्षा डी. श्रीदेवी, सदस्य वाय. सुंदरा राव आणि डॉ. एस. ए. समीरा यांच्या खंडपीठाने दोन्ही बाजू ऐकून घेतल्या. ग्राहकाने सादर केलेले पुरावे आणि बिले इतकी भक्कम होती की मॉलला ते नाकारता आले नाही. धक्कादायक बाब म्हणजे, ग्राहकाने पाठवलेल्या कायदेशीर नोटीसला उत्तर देताना मॉलने आधीच कबूल केले होते की, "प्रॉडक्ट स्कॅन करताना आमच्याकडून तांत्रिक चूक झाली, जी जाणूनबुजून केलेली नव्हती." न्यायालयाने हीच बाब पकडली आणि सांगितले की, लेखी जबाबात मॉलने या चुकीचा कुठेही इन्कार केलेला नाही.

न्यायालयाने स्पष्ट केले की, 'स्कॅनिंगमधील चूक' हे मॉलच्या निष्काळजीपणाचे लक्षण असून ती सेवेतील मोठी त्रुटी आहे. एमआरपीपेक्षा जास्त किंमत वसूल करणे हा थेट ग्राहकाचा छळ आणि गैरवाजवी व्यापारी पद्धतीचा प्रकार आहे.

मंचाने ३० मे रोजी दिलेल्या आपल्या आदेशात 'मोअर रिटेल' आणि त्यांच्या व्यवस्थापकीय संचालकांना खालीलप्रमाणे निर्देश दिले:

- **ग्राहकाकडून घेतलेले जादा ८२ रुपये खरेदीच्या तारखेपासून ते प्रत्यक्ष पैसे मिळेपर्यंत १२ टक्के वार्षिक व्याजासह परत करावेत.**
- **ग्राहकाला झालेल्या मानसिक आणि शारीरिक त्रासाबद्दल ५,००० रुपये भरपाई द्यावी.**
- **न्यायालयीन लढाईच्या खर्चापोटी २,००० रुपये द्यावेत.**

दुसरी घटना: बिअरच्या बाटलीवर १० रुपये जादा घेतल्याने २५,००० चा दंड!

असाच आणखी एक दणका केरळमधील ग्राहक मंचाने एका सरकारी संस्थेला दिला आहे. केरळ स्टेट बेव्हरेजेस कॉर्पोरेशनने (KSBC) एका ग्राहकाकडून बिअरच्या बाटलीवर छापलेल्या एमआरपीपेक्षा १० रुपये जास्त आकारले होते. पठाणमथिट्टा जिल्हा ग्राहक मंचाने ३ जून रोजी यावर निकाल दिला.

मंचाचे अध्यक्ष जॉर्ज बेबी आणि सदस्य निशाद थंकप्पन यांनी सांगितले की, अवघे १०

रुपये जास्त घेणे हा देखील 'सेवेतील मोठा दोष' आहे. यामुळे ग्राहकाला मानसिक त्रास सहन करावा लागला आणि आपल्या मूलभूत हक्कांसाठी न्यायालयात हेलपाटे मारावे लागले. अशा गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी न्यायालयाने बेव्हरेजेस कॉर्पोरेशनला ग्राहकाला तब्बल २५,००० रुपये भरपाई आणि न्यायालयीन खर्च देण्याचे आदेश दिले आहेत.

हे दोन्ही निकाल ग्राहक राजाची ताकद दाखवून देणारे आहेत. विक्रेता कितीही मोठा असला, तरी तो ग्राहकाची एमआरपीपेक्षा एक रुपयाही जास्त घेऊन फसवणूक करू शकत नाही, हेच यातून सिद्ध होते.

सर्वोच्च न्यायालयाकडून अपघातातील पीडितांना मोठा दिलासा; खासगी आरोग्य विम्याची रक्कम अपघात न्यायाधिकरणाच्या भरपाईमधून वजा करता येणार नाही

मेडिक्लेम : 'न्याय्य नुकसानभरपाई' तत्त्वावर शिक्कामोर्तब!

भारतातील मोटर अपघात नुकसानभरपाई कायद्याच्या इतिहासात सर्वोच्च न्यायालयाचा द न्यू इंडिया अॅश्युरन्स कंपनी लिमिटेड विरुद्ध डॉली सतीश गांधी (२०२५) हा निकाल अत्यंत मैलाचा दगड ठरला आहे. मोटर अपघात दावा न्यायाधिकरणाने मंजूर केलेल्या भरपाईमधून, अपघातग्रस्त व्यक्तीला त्याच्या मेडिक्लेम किंवा आरोग्य विमा पॉलिसीद्वारे मिळालेली रक्कम वजा केली जाऊ शकते का? या दीर्घकाळापासून प्रलंबित असलेल्या कायदेशीर वादावर या निकालाने पूर्णविराम दिला आहे.

सर्वोच्च न्यायालयाने अशा प्रकारची वजावट पूर्णपणे बेकायदेशीर ठरवली आहे. हा केवळ एका तांत्रिक किंवा प्रक्रियात्मक वादाचा निपटारा नाही, तर नुकसानभरपाई कायदा, विमा कायदा आणि पुनर्संचयन या सिद्धांतांच्या मूलभूत तत्त्वांचे केलेले एक भक्कम पुनरुज्जीवन आहे.

कायदेशीर वाद नेमका काय होता?

ॲड. हृषिकेश गानू

अनेकदा मोटर अपघातातील पीडितांकडे मोटर वाहन कायद्याव्यतिरिक्त स्वतंत्र आरोग्य विमा पॉलिसी असते. अपघात झाल्यानंतर, जखमी व्यक्ती हॉस्पिटलायझेशन आणि उपचाराचा खर्च मिळवण्यासाठी मेडिक्लेम पॉलिसीअंतर्गत विमा कंपनीकडे दावा करते आणि त्याच वेळी मोटार वाहन कायदा, १९८८ अंतर्गत न्यायाधिकरणासमोर नुकसानभरपाईसाठी दावा दाखल करते.

गेल्या अनेक वर्षांपासून, सामान्य विमा कंपन्या न्यायालयात असा युक्तिवाद करत होत्या की, एकाच उपचारासाठी दोन्ही बाजूंकडून पैसे मिळणे म्हणजे 'दुहेरी वसुली' किंवा 'अवाजवी समृद्धी' आहे. त्यांच्या मते, जर आरोग्य विम्यातून वैद्यकीय खर्च आधीच मिळाला असेल, तर तो मोटार वाहन कायद्यांतर्गत द्यावयाच्या भरपाईमधून वजा केला पाहिजे.

या मुद्द्यावर देशातील विविध उच्च न्यायालयांमध्ये कमालीची मतभिन्नता होती. काही उच्च न्यायालयांनी ही वजावट योग्य मानली, तर काहींनी आरोग्य विम्याला एक स्वतंत्र करारात्मक हक्क मानून वजावटीला नकार दिला. या विसंगतीमुळे अपघातातील पीडित आणि कायदेशीर प्रक्रियेत मोठा संभ्रम निर्माण झाला होता. हा संभ्रम दूर करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाचा हस्तक्षेप अत्यंत आवश्यक बनला होता.

'वैधानिक हक्क' विरुद्ध 'करारात्मक लाभ' यातील फरक

या निकालाच्या केंद्रस्थानी सर्वोच्च न्यायालयाने वैधानिक हक्क आणि करारात्मक लाभ यांमध्ये केलेला स्पष्ट फरक आहे.

वैधानिक हक्क: मोटार वाहन कायद्यांतर्गत मिळणारी भरपाई ही एका कायद्याच्या चौकटीतून निर्माण होते. याचा मुख्य उद्देश अपघातामुळे झालेल्या जखमा, अपंगत्व, उत्पन्नाचे नुकसान, वैद्यकीय खर्च आणि इतर नुकसानीसाठी पीडिताला 'न्याय्य नुकसानभरपाई' मिळवून देणे हा आहे. हा कायदा पीडितांचे कल्याण करण्यासाठी बनवला गेला आहे.

करारात्मक लाभ: याउलट, मेडिक्लेम पॉलिसी हा विमाधारक आणि विमा कंपनी यांच्यातील एक खाजगी करार असतो. विमाधारकाने नियमित प्रीमियम भरल्यामुळे आणि भविष्यातील वैद्यकीय आणीबाणीसाठी स्वतःचे नियोजन केल्यामुळे हा लाभ मिळतो. या हक्काचा उगम कायद्यातून नाही तर खाजगी करारातून होतो.

न्यायालयाने स्पष्ट केले की, दोन्ही रकमा वैद्यकीय उपचारांशी संबंधित असल्या तरी त्यांचे कायदेशीर स्वरूप पूर्णपणे वेगळे आहे. एक रक्कम गुन्हेगार किंवा अपघात करणाऱ्याच्या कायदेशीर दायित्वातून येते, तर दुसरी रक्कम पीडिताने स्वतःच्या पैशातून खरेदी केलेल्या सुरक्षिततेतून येते.

'दुहेरी वसुली'चा युक्तिवाद न्यायालयाने का फेटाळला?

विमा कंपन्यांचा मुख्य आक्षेप असा होता की, पीडिताला एकाच वैद्यकीय खर्चाचे पैसे दोनदा मिळू नयेत. परंतु सर्वोच्च न्यायालयाने आरोग्य विम्याच्या खऱ्या स्वरूपाचे विश्लेषण करून हा युक्तिवाद फेटाळून लावला.

न्यायालयाने नमूद केले की, आरोग्य विम्याचा परतावा ही काही 'देणगी' किंवा 'बक्षीस' नाही. तो पीडिताने प्रीमियम भरून मिळवलेला हक्क आहे. जर ही रक्कम अपघाताच्या भरपाईमधून वजा केली, तर त्याचा थेट फायदा अपघात करणाऱ्या दोषी व्यक्तीला किंवा त्याच्या विमा कंपनीला होईल. म्हणजेच, ज्या कराराशी अपघात करणाऱ्याचा काहीही संबंध नव्हता आणि ज्यासाठी त्याने एक रुपयाचाही प्रीमियम भरला नव्हता, त्याचा फायदा त्याला विनाकारण मिळेल.

हे तत्त्व सामान्य कायद्यातील एका विशेष नियमाशी सुसंगत आहे, ज्यानुसार पीडिताला इतर स्वतंत्र स्रोतांकडून मिळणाऱ्या बाह्य लाभांमुळे गुन्हेगाराची दायित्वाची जबाबदारी कमी होत नाही.

'न्याय्य नुकसानभरपाई' संकल्पनेचे बळकटीकरण

मोटार वाहन कायदा हा एक कल्याणकारी कायदा आहे. न्यायालयाने नेहमीच सांगितले आहे की, भरपाई अशी असावी जी पीडिताला अपघातापूर्वीच्या आर्थिक स्थितीत आणू शकेल.

जर मेडिक्लेमची रक्कम वजा केली गेली, तर एक विचित्र परिस्थिती निर्माण होईल. ज्या जबाबदार नागरिकाने आधीच आरोग्य विमा घेतला आहे, त्याला विमा नसलेल्या व्यक्तीपेक्षा कमी भरपाई मिळेल. हा प्रामाणिक नागरिकांवर आणि विमा घेण्याच्या सार्वजनिक धोरणावर एक प्रकारे अन्याय ठरेल. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे हा विरोधाभास टळला आहे.

पूर्वीच्या न्यायालयीन निर्णयांसोबत सुसंगतता

हा निर्णय भारतीय न्यायालयांच्या जुन्या परंपरेला धरूनच आहे. सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीही स्पष्ट केले आहे की, पीडिताला मिळणारे आयुर्विमा, भविष्य निर्वाह निधी, पेन्शन किंवा इतर वैयक्तिक बचतीचे पैसे अपघात भरपाईमधून वजा केले जाऊ शकत नाहीत. कारण हे लाभ अपघातामुळे निर्माण झालेले नसून, ते व्यक्तीच्या स्वतंत्र योगदानातून मिळालेले असतात. आता मेडिक्लेमलाही याच श्रेणीत ठेवून न्यायालयाने कायद्यात अधिक स्पष्टता आणली आहे.

या निर्णयाचे दूरगामी परिणाम

१. एकसमानता: देशातील सर्व अपघात दावा न्यायालयांना आता एक स्पष्ट दिशा मिळाली आहे, ज्यामुळे वेगवेगळ्या न्यायालयांचे वेगवेगळे निर्णय येणे बंद होईल.

२. विमा कंपन्यांना चाप: अपघाताचे दावे लढवताना विमा कंपन्या आता मेडिक्लेमचे कारण पुढे करून भरपाईची रक्कम कमी करण्याची मागणी करू शकणार नाहीत.

३. पीडितांना सुरक्षा: आरोग्य विमा असणाऱ्या नागरिकांना आता खात्री मिळाली आहे की, त्यांच्या विम्याचा फायदा त्यांच्या अपघाताच्या कायदेशीर दाव्यावर कोणताही नकारात्मक परिणाम करणार नाही.

४. भविष्यातील दावे: हा निर्णय भविष्यात कंपन्यांनी दिलेल्या आरोग्य योजना, सामूहिक विमा आणि इतर सवलतींच्या बाबतीतही मार्गदर्शक ठरेल.

पीडित-केंद्री' भूमिका

या निर्णयाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे न्यायालयाने घेतलेली 'पीडित-केंद्री' भूमिका. अपघात करणाऱ्याच्या चुकीमुळे किंवा निष्काळजीपणामुळे पीडिताचे जे नुकसान झाले आहे, त्याची भरपाई देणे ही कायद्याची जबाबदारी आहे आणि ती पूर्णपणे पार पाडलीच पाहिजे.

थोडक्यात सांगायचे तर, द न्यू इंडिया अॅश्युरन्स कंपनी लिमिटेड विरुद्ध डॉली सतीश गांधी या खटल्यातील सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय हा वैधानिक अधिकार आणि खाजगी करार यांमधील रेषा अधिक ठळक करणारा आहे. या ऐतिहासिक निर्णयामुळे अपघातग्रस्तांना त्यांचे दोन्ही हक्क पूर्णपणे मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असून, नागरिकांच्या आर्थिक नियोजनाचा आदर राखला गेला आहे.

शब्दांकन: ॲड. मानसी चव्हाण

...आणि न्यायाधीशांनी अख्खा खटलाच केला रद्द!

वकिलांनी न वाचताच न्यायालयात सादर केली एआय-निर्मित कागदपत्रे, वकिलांना दंड, दोन वर्षांची बंदी

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

तंत्रज्ञानाचा गैरवापर आणि आळस माणसाला किती महागात पडू शकतो, याचे एक धक्कादायक उदाहरण अमेरिकेतून समोर आले आहे. न्यायालयात खटला जिंकण्यासाठी वकिलांनी स्वतःचे डोके न चालवता थेट 'कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून कायदेशीर कागदपत्रे तयार केली. सर्वात थक्क करणारी बाब म्हणजे, दोन्ही बाजूंच्या वकिलांनी ही कागदपत्रे साधी वाचूनही न पाहता न्यायाधीशांसमोर सादर केली. जेव्हा हा प्रकार उघडकीस आला, तेव्हा न्यायाधीशांनी संतप्त होत संपूर्ण खटलाच रद्द केला आणि संबंधित वकिलांवर कठोर कारवाई केली.

मिसिसिपी येथील फेडरल कोर्टात हा अजब प्रकार घडला आहे. '४०४ मीडिया'च्या वृत्तानुसार, वरिष्ठ युनायटेड स्टेट्स जिल्हा न्यायाधीश शेरियॉन अयकॉक यांनी हा ऐतिहासिक आणि कठोर निर्णय दिला.

हा वाद टॉम विथर्स नावाचे वकील आणि 'ॲबर्डिन' शहर यांच्यात होता. विथर्स यांनी शहरावर थकीत कायदेशीर फी न दिल्याचा आरोप केला होता. या खटल्यात विथर्स यांच्या बाजूने दोन वकील लढत होते. त्यांनी कायदेशीर संशोधन करण्यासाठी आणि न्यायालयात सादर करायचे दावे (BRIEFS) तयार करण्यासाठी AI टूलचा वापर केला. मात्र, AI ने तयार केलेल्या कागदपत्रांमध्ये अनेक खोट्या आणि काल्पनिक कायदेशीर प्रकरणांचे संदर्भ समाविष्ट होते. वकिलांनी हे संदर्भ तपासण्याची तसदीही घेतली नाही आणि ते थेट न्यायालयात सादर केले.

ट्विस्ट तर पुढे आला, जेव्हा समोर आले

की केवळ तक्रारदाराच्याच नव्हे, तर 'ॲबर्डिन' शहराच्या वतीने लढणाऱ्या वकिलांनीही उत्तर देण्यासाठी AI चाच वापर केला होता. म्हणजेच, न्यायालयात प्रत्यक्षात दोन वकिलांऐवजी दोन AI मॉडेल्स एकमेकांसोबत वाद घालत होते आणि वकील फक्त कागदपत्रांची देवाणघेवाण करत होते.

न्यायाधीशांचा तीव्र संताप आणि कठोर कारवाई

हा सर्व प्रकार जेव्हा न्यायाधीश शेरियॉन अयकॉक यांच्या लक्षात आला, तेव्हा त्यांनी तीव्र संताप व्यक्त केला. "न्यायालयावर पुन्हा एकदा AI ने तयार केलेल्या काल्पनिक आणि खोट्या संदर्भांचा कचरा तपासण्याचा बोजा पडला आहे," अशा शब्दांत त्यांनी वकिलांना फटकारले.

न्यायाधीशांनी केवळ खटलाच थांबवला नाही, कठोर कायदेशीर पावले उचलली. सुरू असलेली सुनावणी तात्काळ थांबवून आगामी खटला (TRIAL) रद्द करण्यात आला. दोन्ही बाजूंच्या मुख्य वकिलांना (ज्यांनी AI वापरल्याची कबुली दिली) पुढील दोन वर्षांसाठी या न्यायालयात प्रकरणांची मांडणी करण्यास बंदी घालण्यात आली आहे. निष्काळजीपणा दाखवल्याबद्दल सर्व वकिलांना $१,००० ते $३,५०० (सुमारे ८० हजार ते ३ लाख रुपये) पर्यंतचा दंड ठोठावण्यात आला आहे.

न्यायालयीन क्षेत्रात AI चा वाढता धोका

आजकाल अनेक सर्वसामान्य नागरिक वकील न ठेवता स्वतःची केस लढण्यासाठी AI ची मदत घेत असल्याचे समोर आले आहे. मात्र, पदवी घेतलेल्या आणि लाखो रुपये फी घेणाऱ्या व्यावसायिक वकिलांनीच असा निष्काळजीपणा केल्याने न्यायव्यवस्थेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

कायदा संशोधक डॅमियन चार्लोटिन यांच्या मते, ही काही पहिलीच घटना नाही. त्यांनी केलेल्या संशोधनात आतापर्यंत तब्बल १,५९८ कायदेशीर प्रकरणांमध्ये वकिलांनी AI द्वारे तयार केलेले खोटे कायदेशीर संदर्भ वापरल्याचे उघड झाले आहे. AI अनेकदा जुन्या प्रकरणांचे संदर्भ शोधताना स्वतःच्या मनाने अस्तित्वात नसलेले कायदे किंवा निकालांचे दाखले तयार करते, ज्याला तांत्रिक भाषेत 'AI हॅल्युसिनेशन ' म्हटले जाते.

भविष्यात AI माणसाची जागा घेईल की नाही हा वादाचा विषय असला, तरी सध्या वकिलांनी आपले काम AI वर सोडल्यास त्यांचे करिअर धोक्यात येऊ शकते, हे या घटनेने सिद्ध केले आहे. तंत्रज्ञान हे मदतीसाठी आहे, संपूर्ण कामाची जबाबदारी ढकलण्यासाठी नाही, हाच धडा या निमित्ताने जागतिक न्यायव्यवस्थेला मिळाला आहे.

'जनहित' नावाखाली सुनावणीशिवाय वैमानिकाचा परवाना रद्द करता येणार नाही

मुंबई उच्च न्यायालयाचा १५ वर्षांनंतर एअर इंडियाच्या पायलटचा परवाना बहाल

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

नागरी विमान वाहतूक महासंचालनालय (डीजीसीए) जनहित किंवा आणीबाणीच्या परिस्थितीचा हवाला देऊन वैमानिकाचा परवाना कोणत्याही सुनावणीशिवाय आणि कारणे दाखवा नोटीस न बजावता निलंबित करू शकत नाही, असा महत्त्वपूर्ण निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे. न्यायालयाच्या या निर्णयामुळे एअर इंडियाच्या एका ज्येष्ठ वैमानिकाला (पायलट) तब्बल १५ वर्षांनंतर मोठा दिलासा मिळाला असून, त्यांचा 'एअरलाईन ट्रान्सपोर्ट पायलट लायसन्स' परवाना न्यायालयाने तात्काळ बहाल केला आहे.

न्यायमूर्ती मनीष पितळे आणि न्यायमूर्ती श्रीराम व्ही. शिरसाट यांच्या खंडपीठाने २०११ मधील डीजीसीएचा निलंबनाचा आदेश रद्दबातल ठरवला.

याचिकाकर्ते कॅप्टन जितेंद्र कृष्ण वर्मा यांनी अमेरिकेतून प्रशिक्षण पूर्ण करून १९८८ मध्ये 'कमर्शियल पायलट लायसन्स' (CPL) मिळवला होता. १९९२ मध्ये ते एअर इंडियामध्ये सह-वैमानिक म्हणून रुजू झाले. त्यांनी एअरबस ए३१० सारखी विमाने उडवली असून, त्यांच्या नावावर सुमारे ७,००० तासांचा विमाना उड्डाणाचा दांडगा अनुभव आहे. या अनुभवाच्या जोरावर सप्टेंबर २०१० मध्ये त्यांना वैमानिक क्षेत्रातील सर्वोच्च श्रेणीचा 'ATPL' परवाना देण्यात आला होता.

मात्र, २०११ मध्ये विमान वाहतूक परीक्षांच्या निकालात गैरव्यवहार झाल्याचा आणि बनावट कागदपत्रे वापरल्याचा आरोप करत डीजीसीएने मार्च २०११ मध्ये त्यांचा परवाना तडकाफडकी निलंबित केला. त्यांच्यावर बनावट गुणपत्रिका सादर केल्याचा आरोप करण्यात आला होता.

उच्च न्यायालयाने डीजीसीएच्या कारवाईवर तीव्र आक्षेप घेतला आणि ही कारवाई 'नैसर्गिक न्याय तत्त्वाचा' आणि कायद्याचा स्पष्ट भंग करणारी असून 'विमान नियम, १९३७' च्या नियम ३९ए (RULE ३९A) नुसार, कोणत्याही व्यक्तीचा परवाना निलंबित किंवा रद्द करण्यापूर्वी त्याला कारणे दाखवा नोटीस देणे आणि वैयक्तिक सुनावणीची (PERSONAL HEARING) संधी देणे बंधनकारक आहे. डीजीसीएने या नियमाचे पालन केले नाही.

डीजीसीएने 'नियम १९' का हवाला देत जनहितासाठी ही कारवाई केल्याचे म्हटले होते. मात्र न्यायालयाने स्पष्ट केले की, नियम १९ हा केवळ गुन्हेगारी न्यायालयात दोषी ठरलेल्या व्यक्तींसाठी लागू होतो. याचिकाकर्ते दोषी सिद्ध झालेले नाहीत.

३. पुरावे सादर करण्यात अपयश: डीजीसीएने ज्या कथित 'बनावट गुणपत्रिकेचा' आधार घेतला, ती मूळ गुणपत्रिका किंवा त्यावरील स्वाक्षरी याचिकाकर्त्यांचीच आहे, याचा कोणताही ठोस पुरावा किंवा हस्ताक्षरतज्ज्ञांचा अहवाल न्यायालयासमोर सादर केला नाही.

४. १५ वर्षांनंतरही आरोप निश्चिती नाही: २०११ मध्ये गुन्हा दाखल होऊनही आणि आरोपपत्र दाखल झाले असूनही, १५ वर्षे उलटून गेल्यानंतरही अद्याप कनिष्ठ न्यायालयात वैमानिकाविरुद्ध आरोप निश्चित झालेले नाहीत, याकडेही न्यायालयाने लक्ष वेधले.

खंडपीठाने म्हटले की, डीजीसीएच्या या कारवाईमुळे त्यांच्या अंमलबजावणी नियमावलीतील कलम १२.७ चाही भंग झाला आहे. त्यामुळे हा निलंबनाचा आदेश पूर्णपणे बेकायदेशीर आणि टिकू न शकणारा आहे.

न्यायालयाने याचिकाकर्त्यांचा परवाना त्वरित पूर्ववत करण्याचे आदेश दिले. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयानेही यापूर्वीच त्यांच्या सेवेतून बडतर्फीचा आदेश रद्द केला होता. उच्च न्यायालयाने डीजीसीएला कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून, नियम ३९ए अंतर्गत वैमानिकाला सुनावणीची योग्य संधी देऊन गरज असल्यास नवीन नोटीस जारी करण्याची मुभा दिली आहे.

'डमी' आरोपी हजर केल्याचा वकिलावर खटला

गुन्हा हायकोर्टाकडून रद्द; ठोस पुराव्यांअभावी मोठा दिलासा!

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

न्यायालयात प्रत्यक्ष आरोपीऐवजी दुसऱ्याच व्यक्तीला 'डमी' किंवा 'प्रॉक्सी' म्हणून उभे केल्याच्या गंभीर आरोपात अडकलेल्या एका वकिलाला पाटणा उच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. या प्रकरणात वकिलाविरुद्ध कोणताही ठोस किंवा स्वतंत्र पुरावा उपलब्ध नसल्याचे स्पष्ट करत, न्यायालयाने वकिलाविरुद्ध दाखल झालेली एफआयआर आणि संपूर्ण फौजदारी कारवाई रद्द केली आहे.

"पुराव्यांचा एक कणही नसताना केवळ गृहीतकांवर आधारित वकिलासारख्या कायदेशीर क्षेत्रातील व्यक्तीवर खटला चालवणे, म्हणजे न्यायालयाच्या प्रक्रियेचा गैरवापर आणि एकप्रकारे छळवणूक ठरेल," असे महत्त्वपूर्ण निरीक्षण न्यायमूर्ती अनसुल यांनी आपल्या निकालपत्रात नोंदवले. अधिवक्ता सकलदेव कुमार मंडल यांनी दाखल केलेल्या याचिकेवर १५ मे रोजी हा निकाल देण्यात आला.

हे प्रकरण बिहारमधील जमुई पोलीस ठाण्याशी संबंधित आहे. न्यायालयात प्रलंबित असलेल्या एका खटल्यात मुख्य आरोपीऐवजी 'सुमन कुमार उर्फ आमोद शाह' नावाची दुसरीच व्यक्ती न्यायाधीशांसमोर हजर झाली होती. न्यायालयाच्या कर्मचाऱ्यांनी ही बनवाबनवी पकडली आणि सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे त्या तोतया आरोपीला ताब्यात घेण्यात आले.

पोलीस चौकशीदरम्यान या तोतया आरोपीने असा दावा केला की, "अधिवक्ता सकलदेव मंडल यांनीच मला दुसऱ्याच्या जागी कोर्टात उभे राहण्यास सांगितले होते." या जबाबाच्या आधारे पोलिसांनी वकील मंडल यांच्यावर फसवणूक, बनावट दस्तऐवज तयार करणे, तोतयागिरी आणि गुन्हेगारी कट रचल्याच्या आरोपाखाली भारतीय दंड संहितेच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल केला होता.

या प्रकरणाची सखोल सुनावणी करताना न्यायमूर्ती अनसुल यांनी पोलिसांच्या तपासावर आणि कायदेशीर प्रक्रियेवर गंभीर बोट ठेवले.

न्यायालयाने स्पष्ट केले की, वकिलाविरुद्ध संपूर्ण गुन्हा केवळ सह-आरोपीने पोलिसांसमोर दिलेल्या जबाबावर आधारित आहे. भारतीय कायद्यानुसार पोलिसांसमोर दिलेला असा जबाब न्यायालयात पुरावा म्हणून ग्राह्य धरला जाऊ शकत नाही.

वकिलाने तोतया आरोपीसाठी कोणतीही जामीन याचिका दाखल केली नव्हती, हे पोलिसांनीच मान्य केले आहे. तसेच, कोणत्याही बनावट कागदपत्रावर वकिलाची स्वाक्षरी नाही, कोणत्याही सीसीटीव्ही फुटेजमध्ये ते दिसत नाहीत, अथवा त्यांचे कोणतेही संशयास्पद कॉल रेकॉर्ड किंवा पैशांचे व्यवहार समोर आलेले नाहीत. "आरोप जेवढे गंभीर असतात, तेवढेच ठोस आणि स्वतंत्र पुरावे असणे आवश्यक असते. या प्रकरणात वकिलाला गुन्ह्याशी जोडणारा एकही वैध कायदेशीर पुरावा समोर आलेला नाही," असे कोर्टाने स्पष्ट केले.

उच्च न्यायालयाने पोलिसांच्या भूमिकेवर तीव्र आक्षेप घेत म्हटले की, केवळ संशयाच्या आणि गृहीतकांच्या पत्त्यांच्या बंगल्यावर हा खटला उभा आहे. जर ही कायदेशीर प्रक्रिया अशीच सुरू राहू दिली, तर न्याय देणारी व्यवस्थाच वकिलाविरुद्ध छळणुकीचे माध्यम बनेल. त्यामुळे न्यायालयाने अधिवक्ता सकलदेव मंडल यांच्यावरील सर्व आरोप फेटाळून लावत त्यांना या प्रकरणातून पूर्णपणे मुक्त केले आहे.

या खटल्यात याचिकाकर्त्या वकिलाच्या वतीने अधिवक्ता प्रियांका सिंग, उमेश प्रसाद, बिहारी सेन आणि हर्ष कुमार यांनी काम पाहिले, तर सरकारच्या वतीने अतिरिक्त सरकारी वकील अजित कुमार यांनी बाजू मांडली.

गर्भातील आक्रोशापासून ते उंबरठ्यावरील जाचापर्यंत...

स्त्रीच्या अस्तित्वाचा मरणप्रवास!

स्त्रीचे आयुष्य हे केवळ तिच्या वैयक्तिक प्रवासापुरते मर्यादित नसून समाजाच्या जडणघटनेत तिचा खूप मोठा वाटा असतो. स्त्रीच्या आयुष्यातील प्रत्येक टप्पा हा नवीन अनुभव, संघर्ष आणि जबाबदाऱ्यांनी भरलेला असतो, पण तरीही तिला समाजात हक्काचे स्थान प्राप्त होत नाही, कारण...

जन्म की जन्मठेप?

भारतासारख्या विकसनशील देशात, ज्याला स्वातंत्र्य मिळून ७९ वर्षे झाली, तिथे आजही काही ठिकाणी मुलीचा जन्म हा शाप मानला जातो; जणू जन्माला येणे हेच एक पाप आहे! आजही आईच्या गर्भातच त्या निरागस, निर्मळ आणि कोमल जीवाच्या आशा, तिची स्वप्ने, तिचा आवाज आणि तिचे अस्तित्व संपवण्याचा क्रूर प्रयत्न केला जातो. त्यातून ती कशीबशी वाचलीच, तर लहान वयापासूनच तिच्यावर अनेक मर्यादा घातल्या जातात . मुलगा आणि मुलगी यांच्यातील भेदभावाची दरी आजही अनेक ठिकाणी स्पष्ट दिसते. शिक्षणाच्या संधी नाकारल्या जातात, स्वातंत्र्यावर बंधने आणली जातात. "मुलगी शिकली-सवरली तर हाताबाहेर जाईल," अशी कलुषित आणि गलिच्छ विचारसरणी या समाजात अजूनही मूळ धरून आहे.

माझा सरकारला सवाल आहे की, कुठे गेली तुमची 'बेटी बचाओ, बेटी पढ़ाओ' योजना? ११ वर्षे झाली या योजनेला, मग ही सोंगे फक्त प्रचारापुरतीच मर्यादित आहेत का? स्त्री शिक्षणासाठी, स्त्री सक्षमीकरणासाठी, या पुरुषप्रधान संस्कृतीची पाळेमुळे उखडून टाकण्यासाठी आणि समाजात समानता प्रस्थापित करण्यासाठी सरकारचा निधी कुठे मुरतोय? अर्थातच, याची उत्तरे कोणाकडेच नसतील!

स्वप्नांचा संकोच व चौकटींचे बंधन

मुलींना शिक्षणापासून वंचित ठेवणे, लहान वयातच लग्नासाठी जबरदस्ती करणे या अनिष्ट प्रथांमुळे तिच्या स्वप्नांना कायमची खीळ बसते. १९७८ मध्येच विवाहाचे कायदेशीर वय वाढवले असूनही, एकविसाव्या शतकात आजही अल्पवयीन मुलींची बळजबरीने लग्ने लावून दिली जातात. शिक्षण घेऊन समाजात स्वतःचे स्थान निर्माण करण्याची साधी संधीही काही मुलींना मिळत नाही. शिक्षणासारख्या मूलभूत हक्कासाठीही तिला मोठा संघर्ष करावा लागतो.

लग्नानंतर तर स्त्रियांच्या आयुष्यात आमूलाग्र बदल घडून येतो. नवीन घर, नवीन जबाबदाऱ्या, नवीन बंधने, नवीन मर्यादा आणि नवीन नातेसंबंध... या सगळ्याशी तिला एकटीलाच जुळवून घ्यावे लागते. स्वतःच्या इच्छा, आकांक्षा, अपेक्षा आणि स्वप्ने यांना तिला स्वतःपासून दूर सारावे लागते. अनेकदा तिचे आयुष्य फक्त आणि फक्त घरकाम करणाऱ्या एका 'मजूर' स्त्रीसारखे होऊन जाते. आणि समजा ती आत्मविश्वासाने बाहेर काम करण्यास गेली, तर तिच्यावर नवनवीन बंधने लादली जातात. पुरुषाने रात्री-अपरात्री बाहेर काम केले की त्याची 'वाहवा' होते; पण त्याच जागी जर स्त्री असेल तर, "असे कसले काम आहे हिचे, जे रात्री करावे लागते?" असा कुत्सित प्रश्न विचारून तिची बदनामी केली जाते, तिला अपवित्र ठरवले जाते. ही बदनामी करण्यामागे समाजातील माळकटलेल्या, पुरुषप्रधान मानसिकतेच्या स्त्रियांचाच मोठा वाटा असतो, हे भारतीय समाजव्यवस्थेचे एक कटू सत्य आहे.

या समाजाच्या रीतीप्रमाणे स्त्री लहान असताना बापाच्या घरात राहते नंतर भावाच्या छत्राखाली लग्नानंतर नवऱ्याच्या घरात आणि म्हातारपणात मुलाच्या दारात!

तिला स्वतःचे हक्काचे घर कधी मिळतच नाही. लग्नानंतर तिच्या आयुष्याच्या पुस्तकात अडचणींची पाने अधिकच वाढतात. तिला सासरच्या जाचाला सामोरे जावे लागते. त्यात 'हुंडा' या अमानुष प्रथेमुळे स्त्रियांना दिवस-रात्र छळले जाते. तिच्या माहेरच्यांना हुंड्यासाठी धमक्या दिल्या जातात. काही स्त्रिया या नरकयातना निमूटपणे सहन करतात, तर वैष्णवी हगवणे हिच्यासारख्या काही भगिनी या छळाला कंटाळून आत्महत्येचे टोकाचे पाऊल उचलतात आणि या आयुष्यभराच्या त्रासाला एकदाचा पूर्णविराम देतात. अगदी छोट्या-छोट्या गोष्टींवरून स्त्रियांवर घरगुती हिंसाचार केला जातो. हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१ पासून लागू करण्यात आला आहे, पण त्याने समाजात काही फारसा बदल झालेला दिसत नाही.

कायद्याची ढाल आणि वास्तवाचे प्रहार

कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा लागू होऊनही २० वर्षे झाली, तरी आजही जेवणात मीठ कमी पडले म्हणून पुरुष घरातल्या स्त्रीवर हात उचलतात. आपली न्यायव्यवस्था जेव्हा या गंभीर गुन्ह्यांना खरोखरच तितक्याच गांभीर्याने घेईल, तेव्हाच कुठेतरी बदलाची शक्यता निर्माण होईल.

असे इतरांसाठी आपले संपूर्ण आयुष्य व्यतित करत असताना, या निर्लज्ज समाजातील अमानुष नराधम त्या स्त्रीला सुखाने जगूही देत नाहीत. मग ती २२ वर्षांची ज्योती सिंग असो, २९ वर्षांची डॉक्टर संपदा मुंडे असो किंवा अवघ्या चार वर्षांची निरागस बालिका असो... कोणत्याही वयाच्या स्त्रीला 'सुरक्षा' नावाची गोष्ट भारतात सहज उपलब्ध नाही. भारताच्या सुरक्षा व्यवस्थेला काळीमा फासणारी ही आजची खरी परिस्थिती आहे. चिखलात उगवलेल्या त्या कमळाला उमलण्यापूर्वीच चिखलात तुडवले जाते

मोकळा श्वास घेऊन उंच भरारी घेणाऱ्या त्या पाखराला मागे खेचून जाळ्यात अडकवले जाते आयुष्य जगण्याच्या त्या आशेला लग्नाच्या बेड्यांमध्ये जखडले जाते आणि स्वतःला सिद्ध करण्यापूर्वीच तिचे अस्तित्व संपवले जाते. स्त्रीच्या या कठीण जीवनप्रवासात पुरुष तर अडथळे निर्माण करतातच, पण त्याहीपेक्षा जास्त अडचणी गंजलेल्या, बुरसटलेल्या आणि पुरुषप्रधान मानसिकतेच्या स्त्रिया निर्माण करतात, हे दुर्दैव!

जन्मताच ओझं बनलेली ती, या निष्ठुर समाजात स्वास्तित्व निर्माती ती, आदिशक्ती, जगदंबा,महाकाली म्हणवली जाणारी ती, निर्बंध, जबाबदाऱ्या, दुःख, वेदना आणि संशयाखाली दबलेली ती,आयुष्य मात्र स्वतःसाठी जगलीच नाही अशी ती, म्हणजेच... "स्त्री"!

कु. पायल नवनाथ वाडकर,
बी.ए.एलएलबी,
केजेईआय त्रिनिटी कॉलेज ऑफ लॉ.

झाडाची फांदी गाडीवर पडणे हा 'मोटार अपघात' नाही

तरीही सर्वोच्च न्यायालयाचा अपंग प्रवाशाला २५ लाखांचा दिलासा

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

रस्त्याच्या कडेला उभी असलेल्या वाहनावर झाड किंवा त्याची फांदी पडल्यास तो 'मोटार वाहन कायदा, १९८८' (MV Act) च्या अंतर्गत मोटार अपघात मानता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निर्णय सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी दिला. अपघात घडण्यात संबंधित वाहनाची कोणतीही सक्रिय भूमिका नसल्यामुळे, मोटार वाहन कायद्याच्या कलम १६६ अंतर्गत नुकसानभरपाईचा दावा करणे योग्य नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

मात्र, मानवतावादी दृष्टिकोन आणि घटनात्मक तत्त्वांचे पालन करत, न्यायालयाने आपल्या विशेष अधिकारांचा (कलम १४२) वापर करून, या अपघातात गंभीर जखमी

झालेल्या प्रवाशाला **२५ लाख रुपयांची** भरपाई मंजूर केली. न्यायमूर्ती संजय करोल आणि न्यायमूर्ती नोंगमीकापम कोटिश्वर सिंग यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला.

हे प्रकरण जून २००७ मधील आहे. के. के. उमेश कुमार हे बंगळुरूमध्ये एका ऑटोरिक्षाने प्रवास करत होते. मुसळधार पावसामुळे चालकाने ऑटोरिक्षा रस्त्याच्या कडेला एका जुन्या झाडाखाली उभी केली. रिक्षा उभी असतानाच झाडाची एक मोठी फांदी रिक्षावर पडली. या दुर्दैवी घटनेत उमेश कुमार गंभीर जखमी झाले आणि त्यांना कायमचे अपंगत्व (पॅरालिसिस) आले.

त्यांनी ५० लाख रुपयांच्या भरपाईसाठी बंगळुरूच्या 'मोटार अपघात दावा प्राधिकरणा'कडे (एमएसीटी) अर्ज केला होता. मात्र, प्राधिकरणाने ही घटना 'नैसर्गिक आपत्ती' (एक्ट ऑफ गॉड) ठरवून त्यांचा दावा फेटाळला होता. त्यानंतर कर्नाटक उच्च न्यायालयाने त्यांच्या अपीलावर १७.१० लाख रुपयांची भरपाई मंजूर केली होती. यामध्ये ब्रुहत बेंगळुरू महानगर पालिका २५%, विमा कंपनी ५०%, आणि राज्य फलोत्पादन विभाग २५% भरपाई देईल, असे दायित्व निश्चित करण्यात आले होते. या निर्णयाला बीबीएमपीने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते.

सर्वोच्च न्यायालयाने पालिका आणि फलोत्पादन विभागाचा युक्तिवाद मान्य केला की, मुसळधार पावसात झाडाखाली आश्रय घेणे किंवा फांदी पडणे, याचा अंदाज अधिकारी किंवा चालकाला येणे शक्य नव्हते. त्यामुळे मोटार वाहन कायद्यांतर्गत प्रशासनावर हे दायित्व लादणे अयोग्य ठरेल. न्यायालयाने म्हटले की, भारतातील शहरांच्या सीमा सातत्याने विस्तारत आहेत. अशा परिस्थितीत महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी रस्त्यावरील प्रत्येक झाडावर सतत लक्ष ठेवावे, अशी अपेक्षा करणे अवास्तव आहे. तसेच "सर्व जुन्या झाडांच्या फांद्या करवतीने कापून टाकणे" हा शहाणपणाचा उपाय असू शकत नाही. कायदेशीर तांत्रिकतेनुसार हा मोटार अपघात नसला, तरी न्यायालयाने एका अपंग व्यक्तीला हलाखीच्या परिस्थितीत सोडण्यास नकार दिला. "एखाद्या व्यक्तीला आयुष्य उद्ध्वस्त करणाऱ्या जखमा झाल्या असताना, त्याला स्वतःचा उदरनिर्वाह करण्यासाठी पैशांशिवाय वाऱ्यावर सोडणे न्यायाच्या भावनेला पटणारे नाही," असे संवेदनशील निरीक्षण खंडपीठाने नोंदवले.

उच्च न्यायालयाने दिलेली १७.१० लाखांची भरपाई अपुरी असल्याचे मानत, सर्वोच्च न्यायालयाने ती वाढवून २५ लाख रुपये केली. ही रक्कम ४ आठवड्यांच्या आत अदा करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

कर्मचारी योग व व्यायाम कक्ष

न्यायालयीन कर्मचाऱ्यांचे कामाचे स्वरूप बसून राहण्याचे असल्याने त्यांना पाठदुखी आणि इतर शारीरिक समस्या उद्भवतात. प्रशासनाने कर्मचाऱ्यांसाठी एक छोटा 'योगा कक्ष' सुरू करून तिथे प्रशिक्षकाची नियुक्ती करावी. सकाळी कामाच्या आधी १५ मिनिटांची योगासने केल्यास कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढेल आणि कामातील उत्साह टिकून राहील. यामुळे कर्मचाऱ्यांचे आरोग्य जपले जाईल.

कोर्ट लिपिक, शिवाजीनगर, पुणे

हाय-स्पीड वाय-फाय झोन

ई-फायलिंग अनिवार्य होत असताना अनेकदा वकिलांना नेटवर्कच्या समस्येमुळे फाईल्स अपलोड करताना अडचणी येतात. प्रशासनाने संपूर्ण न्यायालय परिसरात वकील आणि कर्मचाऱ्यांसाठी एक सुरक्षित 'हाय-स्पीड वाय-फाय झोन' उपलब्ध करून द्यावा. डिजिटल इंडियाच्या मोहिमेला बळकटी देण्यासाठी ही मूलभूत सुविधा असणे अत्यंत आवश्यक आहे. यामुळे तांत्रिक कामांचा वेग वाढेल आणि वकिलांचा वेळ वाचेल.

ॲड. सायली देशपांडे, ॲडव्होकेट, कोथरूड, पुणे

निकालांचे मराठी ऑडिओ-बुक्स

अनेकदा तांत्रिक निकालांची भाषा पक्षकारांना समजत नाही. प्रशासनाने निकालांचा मराठीत अनुवाद करून त्याचे 'ऑडिओ-बुक' तयार करावे, जे क्यूआर कोडद्वारे स्कॅन करून पक्षकारांना ऐकता येईल. कायद्याचे ज्ञान सोप्या भाषेत कानावर पडल्यास नागरिकांमधील कायदेशीर जागरूकता वाढेल. दृष्टिहीन पक्षकारांसाठी ही सुविधा वरदान ठरेल आणि न्यायव्यवस्थेची पारदर्शकता वाढण्यास मदत होईल.

पक्षकार विनायक गोखले, सदाशिव पेठ, पुणे

वकिलांच्या चेंबरमधील पाण्याच्या टाक्यांची स्वच्छता

अनेक जुन्या वकिलांच्या चेंबर्सना पाणीपुरवठा करणाऱ्या टाक्यांची वर्षानुवर्षे स्वच्छता झालेली नाही. प्रशासनाने दर सहा महिन्यांनी सर्व इमारतींच्या पाण्याच्या टाक्यांची स्वच्छता करून त्याचे प्रमाणपत्र दर्शनी भागात लावावे. शुद्ध आणि आरोग्यदायी पाणी हा सर्वांचा मूलभूत हक्क आहे. प्रशासनाने याकडे प्राधान्याने लक्ष देऊन वकिलांच्या आरोग्याची काळजी घेणे गरजेचे आहे.

ॲड. नितीन कुलकर्णी, ॲडव्होकेट, कॅम्प, पुणे

ई-माईक सिस्टीम सुधारणा

कोर्ट रूमच्या बाहेर लावलेले माईक अनेकदा नादुरुस्त असतात. प्रशासनाने प्रत्येक कोर्ट रूमसाठी दर्जेदार 'ई-माईक सिस्टीम' खरेदी करावी. स्पष्ट आवाजामुळे पक्षकारांना आपला नंबर चुकणार नाही याची खात्री पटेल आणि कोर्टाचे कामकाज विनाअडथळा सुरू राहील. तांत्रिक उपकरणांची गुणवत्ता सुधारल्यास न्यायालयीन कामकाजाची गती वाढेल आणि गोंधळ कमी होईल.

कोर्ट लिपिक, शिवाजीनगर, पुणे

इलेक्ट्रिक कचरावेचक यंत्रे

न्यायालय परिसरातील कचरा उचलण्यासाठी प्रशासनाने छोट्या बॅटरीवर चालणाऱ्या 'इलेक्ट्रिक कचरा वेचणाऱ्या' गाड्या खरेदी कराव्यात. यामुळे परिसर चकाचक राहील आणि स्वच्छता कर्मचाऱ्यांवरचा कामाचा ताण कमी होईल. स्वच्छ व टापटीप न्यायालय हे न्यायदानाच्या पवित्रतेचे प्रतीक आहे. कचरा व्यवस्थापनाचे आधुनिकीकरण केल्यास न्यायालय परिसर स्वच्छ राहील.

सामाजिक कार्यकर्ता स्नेहल पाटील, कर्वेनगर, पुणे

मल्टी-लिंग्वल हेल्पडेस्क

पुणे न्यायालयात विविध प्रांतांतून लोक येतात, ज्यांना मराठी किंवा इंग्रजी नीट समजत नाही. प्रशासनाने हिंदी आणि इंग्रजी बोलणारे प्रतिनिधी असलेला एक 'मल्टी-लिंग्वल हेल्पडेस्क' सुरू करावा. भाषेची अडचण दूर झाल्यामुळे पक्षकारांना आपली समस्या मांडणे सोपे होईल आणि गैरसमजातून होणारे फसवणुकीचे प्रकार टळतील. माहिती केंद्राचे सक्षमीकरण हे न्यायदानाची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी गरजेचे आहे.

सामाजिक कार्यकर्ता विजय तावरे, बिबवेवाडी, पुणे

रेकॉर्ड रूम बायोमेट्रिक प्रवेश

रेकॉर्ड रूममधील गोपनीय कागदपत्रांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासनाने तिथे फक्त अधिकृत कर्मचाऱ्यांना प्रवेश मिळावा यासाठी 'बायोमेट्रिक फिंगरप्रिंट' लॉक बसवावे. यामुळे फाईल्सची फेरफार किंवा चोरी होण्यासारखे प्रकार कायमचे थांबतील. कायदेशीर दस्ताऐवजांची गोपनीयता राखणे ही न्यायव्यवस्थेची सर्वोच्च प्राथमिकता असायला हवी. सुरक्षेचे हे आधुनिक तंत्रज्ञान प्रशासकीय शिस्त निर्माण करण्यास मदत करेल.

निवृत्त न्यायाधीश, प्रभात रोड, पुणे

सौर पथदिव्यांचे सक्षमीकरण

संध्याकाळच्या वेळी न्यायालयाच्या बाहेरच्या भागात पुरेसा प्रकाश नसल्यामुळे सुरक्षिततेचे प्रश्न निर्माण होतात. प्रशासनाने संपूर्ण परिसरात अधिक तीव्रतेचे 'सोलर स्ट्रीट लाइट्स' बसवावेत. उजेडामुळे सुरक्षिततेची भावना वाढेल आणि सायंकाळच्या वेळी बाहेर पडणाऱ्या महिला वकील व पक्षकारांना अधिक सुरक्षित वाटेल. पर्यायी ऊर्जा स्रोतांचा वापर करून न्यायालयाचा परिसर सुरक्षित आणि प्रकाशमान ठेवणे ही प्रशासनाची महत्त्वाची जबाबदारी आहे.

पोलीस कर्मचारी, शिवाजीनगर, पुणे

वाचकांनी आपली पत्रे punebarandbench@gmail.com वर पाठवावीत किंवा, संपादक, पुणे बार अँड बेंच, ऑफिस नं. ७, पहिला मजला, चुनावाला चेंबर्स, शिक्षण मंडळाशेजारी, जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे ५ या पत्त्यावर पाठवावीत.

जिंतूरच्या डोंगरदऱ्यांतून न्यायव्यवस्थेच्या सर्वोच्च पदापर्यंत

दोन हजारांहून अधिक प्रकरणांमध्ये प्रभावी युक्तिवाद ते मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीशपद

भौगोलिकदृष्ट्या कठीण परिस्थिती, मर्यादित साधनसंपत्ती आणि डोंगराळ भाग अशी ओळख असलेल्या परभणी जिल्ह्यातील जिंतूर तालुक्याने देशाला नेहमीच कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वे दिली आहेत. याच मातीतून उगम पावलेले एक तेजस्वी व्यक्तिमत्त्व आज देशाच्या न्यायव्यवस्थेतील अत्यंत प्रतिष्ठेच्या आणि सर्वोच्च पदांपैकी एका पदावर विराजमान झाले आहे. जिंतूर तालुक्यातील केहाळ या छोट्याशा गावाचे सुपुत्र न्यायमूर्ती रवींद्र विठ्ठलराव घुगे यांची मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशपदी नियुक्ती झाली आहे. ही बातमी समजताच संपूर्ण परभणी जिल्हा आणि मराठवाड्यात आनंदाचा लाट पसरली असून, अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

केहाळसारख्या ग्रामीण भागातून सुरू झालेला हा प्रवास मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशपदापर्यंत कसा पोहोचला, ही केवळ एका व्यक्तीच्या यशाची गाथा नाही, तर ग्रामीण भागातील जिद्द, चिकाटी आणि गुणवत्तेच्या बळावर मिळवलेल्या यशाचे ते एक जिवंत उदाहरण आहे.

न्यायमूर्ती रवींद्र विठ्ठलराव घुगे

जिंतूरच्या मातीचा वारसा आणि इतिहास

जिंतूर तालुका हा परभणी जिल्ह्यातील भौगोलिकदृष्ट्या सर्वांत मोठा तालुका मानला जातो. या भागातील उत्तरेकडील डोंगराळ प्रदेश आणि रोजच्या जगण्यातील संघर्ष सर्वश्रुत आहे. परंतु, अशा कठीण परिस्थितीतही या भूमीने शिक्षण, प्रशासन, साहित्य, समाजकारण आणि न्यायव्यवस्थेला अनेक रत्ने दिली आहेत. केहाळ गावाने आज न्यायमूर्ती रवींद्र घुगे यांच्या रूपाने इतिहास घडविला असून, या भागाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. हा क्षण जिंतूरच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिला जाणारा क्षण ठरला आहे.

न्यायमूर्ती रवींद्र घुगे यांना घरातूनच उच्च शिक्षणाचा आणि समाजसेवेचा मोठा वारसा लाभला आहे. ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू, प्रख्यात अर्थतज्ज्ञ आणि ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. विठ्ठलराव घुगे व सौ. मीना घुगे यांचे सुपुत्र आहेत. माता-पित्यांकडून मिळालेले संस्कार, अभ्यासू वृत्ती, सामाजिक बांधिलकी आणि कठोर परिश्रम यांच्या बळावर त्यांनी वकिली क्षेत्रात आपले पाय रोवले.

१९९० सालापासून त्यांनी वकिली व्यवसायाला सुरुवात केली. सुरुवातीच्या काळात त्यांनी मुंबई उच्च न्यायालय, तसेच कामगार आणि औद्योगिक न्यायालयांमध्ये वकिली करताना सर्वसामान्यांचे प्रश्न प्रभावीपणे मांडले. विशेषतः कामगार आणि कामगार संघटनांच्या बाजूने त्यांनी दोन हजारांपेक्षा जास्त प्रकरणांमध्ये न्यायालयात युक्तिवाद केला. कामगारांच्या हक्कांसाठी त्यांनी दिलेला लढा आणि त्यांची कायद्याची सखोल जाण यामुळे कायदेशीर क्षेत्रात त्यांची एक स्वतंत्र आणि दबदबा निर्माण करणारी ओळख तयार झाली.

कायद्याचे सखोल ज्ञान आणि औद्योगिक क्षेत्रातील योगदान

सुरुवातीच्या संघर्षानंतर, न्यायमूर्ती घुगे यांनी अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या, मोठे उद्योगसमूह आणि देशातील प्रतिष्ठित संस्थांचे कायदेशीर प्रतिनिधी म्हणून काम पाहिले. औद्योगिक, कामगार आणि सेवा कायद्याच्या (Industrial and Labour Laws) क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य मैलाचा दगड ठरले आहे. कायद्याची सूक्ष्म पकड, न्यायनिष्ठ दृष्टिकोन आणि न्यायालयात अत्यंत प्रभावीपणे बाजू मांडण्याची त्यांची शैली यामुळे त्यांनी विधिक्षेत्रात स्वतःचे एक वेगळे स्थान निर्माण केले. त्यांच्या याच कायदेशीर कौशल्यामुळे त्यांची ख्याती देशभरात पसरली.

शैक्षणिक आणि संशोधन क्षेत्रातील अमूल्य कार्य

न्यायव्यवस्थेत अहोरात्र कार्यरत असतानाही न्यायमूर्ती रवींद्र घुगे यांनी शिक्षण क्षेत्राशी असलेले आपले नाते कधीही तुटू दिले नाही. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात एल.एल.एम. (LL.M.) अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी योगदान प्राध्यापक म्हणून दीर्घकाळ सेवा दिली. याशिवाय, विविध राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय परिसंवाद, कार्यशाळा आणि चर्चासत्रांमध्ये त्यांनी मार्गदर्शकाची भूमिका बजावली. कायद्याच्या विविध क्लिष्ट विषयांवर त्यांनी केलेले संशोधनपर लेखन आणि लेख आज कायदेशीर क्षेत्रातील अभ्यासकांसाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जातात. त्यांच्या या शैक्षणिक योगदानाला विधिक्षेत्रात मोठी मान्यता मिळाली आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी अखंड दीपस्तंभ

न्यायमूर्ती रवींद्र घुगे यांची मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशपदी झालेली ही नियुक्ती त्यांच्या प्रदीर्घ, यशस्वी आणि निष्कलंक कारकिर्दीची पोचपावती आहे. त्यांचे हे यश केवळ एका व्यक्तीपुरते मर्यादित नसून, ते ग्रामीण भागातील लाखो तरुणांना स्वप्न पाहण्याची आणि ती पूर्ण करण्याची ताकद देणारे आहे.

"ग्रामीण भागात सोयी-सुविधांची कमतरता असली, तरी जर मनात जिद्द, कठोर परिश्रम करण्याची तयारी आणि शिक्षणाची योग्य साथ असेल, तर माणूस देशाच्या सर्वोच्च पदावर पोहोचू शकतो, हे न्यायमूर्ती घुगे यांनी सिद्ध करून दाखवले आहे."

आज केहाळसह जिंतूर तालुक्यातील प्रत्येक गावात, प्रत्येक शाळेत आणि प्रत्येक घराघरात त्यांच्या या यशाची चर्चा आहे. 'आपल्या मातीतील, आपल्या गावचा मुलगा आज देशातील एका महत्त्वाच्या उच्च न्यायालयाचा मुख्य न्यायाधीश झाला आहे,' ही भावना ग्रामीण भागातील प्रत्येक विद्यार्थ्याच्या मनात एक नवीन ऊर्जा निर्माण करत आहे. येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी न्यायमूर्ती घुगे यांचे हे यश एका अखंड दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरणार आहे. या ऐतिहासिक नियुक्तीनंतर संपूर्ण महाराष्ट्रातून, विशेषतः मराठवाड्यातून न्यायमूर्ती रवींद्र घुगे यांच्यावर कौतुकाचा आणि अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि कायदेशीर क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांच्या या यशाचे स्वागत केले आहे. ग्रामीण भागातून येऊन न्यायव्यवस्थेचे सर्वोच्च शिखर सर करणाऱ्या या सुपुत्राचा सार्थ अभिमान आज प्रत्येक परभणीकराला वाटत आहे. डोंगरदऱ्यांच्या कुशीतून सुरू झालेला हा प्रवास आज खऱ्या अर्थाने 'न्यायशिखरावर' पोहोचला आहे!

लंडनमध्ये मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती आणि त्यांच्या कुटुंबाला इंग्लंड पोलिसांकडून सुरक्षा

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती गौतम पटेल आणि त्यांच्या कुटुंबाला धमक्या आणि हल्ल्यांचा सामना करावा लागल्यानंतर युके (युनायटेड किंगडम) पोलिसांनी त्यांना लंडनमध्ये सुरक्षा पुरवली आहे.

न्यायमूर्ती पटेल यांच्या मुलीलाजी ब्रिटिश नागरिक आहेतिच्या लंडनमधील घराजवळ झालेल्या एका शारीरिक हल्ल्यानंतर काही आठवड्यांतच, म्हणजेच ५ जून रोजी एक जीवे मारण्याची धमकी देणारे पत्र मिळाले. सोमवारी पटेल यांनी सांगितले की, त्यांच्या मुलीवर तिच्या घराजवळ एका मुखवटाधारी आणि हुडी घातलेल्या व्यक्तीने हल्ला केला होता, ज्याने तिला वारंवार बुक्के मारले.

निकालाचा पूर्वग्रह आणि धमक्या

ही जीवे मारण्याची धमकी एप्रिल २०२४ मध्ये न्यायमूर्ती पटेल यांनी दिलेल्या एका निकालाच्या संदर्भात आली आहे. हे प्रकरण सध्या अपीलात प्रलंबित असून, दाऊदी बोहरा समुदायाचे आध्यात्मिक नेते 'सैय्यदना' यांच्या उत्तराधिकाराचा निर्णय लावण्यासाठी हे दाखल करण्यात आले होते. न्यायमूर्ती पटेल यांनी सैय्यदना मुफद्दल सैफुद्दीन यांचा ५३ वे दाई आणि समुदायाचे नेते म्हणून असलेला दावा कायम ठेवला होता.

गेल्या १० महिन्यांत न्यायमूर्ती पटेल यांना अनेक धमकीची पत्रे मिळाली आहेत, ज्यामध्ये एका पत्रात त्यांच्यावर "दडपणाखाली आणि फसवणुकीने" काम केल्याचा आरोप करण्यात आला होता. युके पोलिसांनी सांगितले की, "डिटेक्टिव्ह (गुप्तहेर) ऑगस्ट २०२५ मध्ये नोंदवलेली एक चोरीचा प्रयत्न आणि धमकीची चिठ्ठी, एप्रिल २०२६ मधील एक हल्ला आणि त्यानंतर जून २०२६ मध्ये मिळालेल्या धमक्या अशा अनेक घटनांची चौकशी करत आहेत. कुटुंबाला सुरक्षा कवच पुरवण्यात आले आहे."

मुंबईत जनहित याचिका दाखल

या घटनेनंतर, मुंबई बार असोसिएशन आणि इतर दोन बार असोसिएशनने बुधवारी मुंबई उच्च न्यायालयात एक जनहित याचिका (PIL) दाखल केली आहे. या प्रकरणाच्या चौकशीसाठी तात्काळ एक विशेष तपास पथक (SIT) स्थापन करण्यात यावे, अशी मागणी या याचिकेत करण्यात आली आहे.

या याचिकेत तीव्र चिंता व्यक्त करण्यात आली असून, "न्यायाधीश आणि वकिलांच्या सुरक्षेबाबत भारतातील सद्यस्थितीची सर्वोच्च न्यायालयाने आधीच दखल घेऊनही, परिस्थितीमध्ये कोणताही सकारात्मक बदल झालेला नाही," हे अत्यंत वेदनादायक असल्याचे म्हटले आहे.

जॅकलिन फर्नांडिसला तूर्तास दिलासा नाही

न्यायमूर्ती प्रशांत कुमार मिश्रा यांचा सुनावणीतून नकार

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

कथित गुन्हेगार सुकेश चंद्रशेखरशी संबंधित २०० कोटी रुपयांच्या मनी लॉंड्रिंग प्रकरणात बॉलिवूड अभिनेत्री जॅकलिन फर्नांडिसला सर्वोच्च न्यायालयाकडून तूर्तास कोणताही दिलासा मिळालेला नाही. दिल्ली न्यायालयाच्या आरोप निश्चितीच्या आदेशाविरोधात जॅकलिनने दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करण्यास गुरुवारी सुप्रीम कोर्टाच्या खंडपीठाने नकार दिला. खंडपीठातील न्यायमूर्ती प्रशांत कुमार मिश्रा यांनी या प्रकरणातून स्वतःला बाजूला (Recuse) केल्यामुळे आता या प्रकरणाची सुनावणी चालू महिन्याच्या अखेरीस दुसऱ्या खंडपीठासमोर होणार आहे.

अंमलबजावणी संचालनालयाने (ED) दाखल केलेल्या मनी लॉंड्रिंगच्या गुन्ह्यात जॅकलिन फर्नांडिस, सुकेश चंद्रशेखर आणि इतर आरोपींविरुद्ध आरोप निश्चित करण्याचे आदेश दिल्लीच्या विशेष न्यायालयाने अलीकडेच दिले होते. या आदेशाला जॅकलिनने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे.

'ईडी'च्या आरोपानुसार, जॅकलिन ही सुकेश चंद्रशेखरच्या सतत संपर्कात होती आणि तिने सुकेशची सहकारी पिंकी इराणी हिच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांच्या महागड्या भेटवस्तू स्वीकारल्या होत्या. सुकेश चंद्रशेखरने तुरुंगात असतानाच आपले गुन्हेगारी नेटवर्क चालवले आणि वरिष्ठ सरकारी अधिकारी असल्याचे भासवून, बनावट ओळखींद्वारे तसेच एन्क्रिप्टेड कॉल्सचा वापर करून अनेकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप तपास यंत्रणेने केला आहे.

न्यायमूर्ती प्रशांत कुमार मिश्रा आणि न्यायमूर्ती अतुल एस. चांदूरकर यांच्या खंडपीठासमोर ही याचिका सुनावणीसाठी आली होती. मात्र, खंडपीठाने याचिकेच्या गुणवत्तेवर (Merits) कोणताही युक्तिवाद ऐकून घेतला नाही.

जारमधलं अर्धं कापलेलं डोकं सांगतंय ७४ वर्षांपूर्वीच्या एका थरारक खुनाची गोष्ट

मद्रास मेडिकल कॉलेजमधील जार नंबर M११ चं रहस्य; डिएनए, कॉम्प्युटर नसलेल्या काळातील 'ती' ऐतिहासिक चौकशी

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

एका काचेच्या जारमध्ये, फॉर्मेलिनच्या द्रवपदार्थात तरंगणारं एक माणसाचं अर्धं कापलेलं डोकं... चेहऱ्यावर संथ भाव, पण डोळ्यांसमोर उभं करणारं एक भयंकर रहस्य! चेन्नईच्या मद्रास मेडिकल कॉलेजच्या फॉरेन्सिक म्युझियममधील जार नंबर M११ कडे पाहिलं की अंगावर काटा आल्याशिवाय राहत नाही. तिथे कोणतीही फाईल नाही, अधिकृत कागदपत्र नाही की हे डोकं कोणाचं आहे आणि ते असं मधोमध का कापलं गेलं आहे, याचा कोणताही लिखित रेकॉर्ड नाही. पण तरीही, गेली कित्येक दशकं फॉरेन्सिक सायन्सचे प्राध्यापक आपल्या विद्यार्थ्यांना एका खुनाची आणि त्याहूनही थरारक अशा तपासाची गोष्ट सांगत आले आहेत.

ही गोष्ट आहे १९५२ मधील अलवंदर हत्याकांडाची. डिएनए टेस्ट, फिंगरप्रिंट डेटाबेस किंवा फॉरेन्सिक सॉफ्टवेअरचा शोधही लागला नसलेल्या काळात, केवळ शरीररचना शास्त्र आणि उपलब्ध पुराव्यांच्या आधारे एका मृतदेहाची ओळख कशी पटवली गेली, याचा हा एक क्लासिक वस्तुपाठ आहे.

या थराराची सुरुवात झाली २९ ऑगस्ट १९५२ रोजी. मद्रासला कोलंबोशी जोडणाऱ्या इंडो-सिलोन एक्स्प्रेस (ज्याला बोट मेल म्हणूनही ओळखले जायचे) मधील एका डब्यातून प्रचंड दुर्गंधी येऊ लागली. मदुराईपासून ५३ किमी अंतरावर असलेल्या मानामदुराई रेल्वे स्थानकावर रेल्वे पोलिसांनी संशयास्पद वाटणारी एक हिरवी स्टीलची ट्रंक उघडली. ती उघडताच पोलिसांचे डोके चक्रावले; त्यात एका पुरुषाचे धड होते, पण त्याचे डोके गायब होते.

या घटनेनंतर संपूर्ण मद्रास प्रांतात खळबळ माजली. काही दिवसांनंतर, मद्रासमधीलच रॉयपुरम समुद्रकिनाऱ्यावर वाळूत पुरलेले एक छिन्नविच्छिन्न झालेले मानवी डोकं सापडले. पोलिसांनी तात्काळ हे दोन्ही अवयव मद्रास मेडिकल कॉलेजमध्ये तपासणीसाठी पाठवले.



त्या काळी आजच्यासारखे प्रगत तंत्रज्ञान नव्हते. फॉरेन्सिक मेडिसिनचे तत्कालीन सहाय्यक प्राध्यापक डॉ. सी. बी. गोपालकृष्णन यांच्यासमोर हे आव्हान होते. त्यांनी निव्वळ शरीररचनाशास्त्राचा वापर केला. त्यांनी सापडलेल्या डोक्याच्या मानेचे मणके आणि ट्रंकमध्ये सापडलेल्या धडाच्या मानेचे मणके एकमेकांना जोडून पाहिले. हाडाला हाड तंतोतंत मॅच झाले!

धड आणि डोकं एकाच व्यक्तीचं आहे यावर शिक्कामोर्तब झाल्यानंतर पुढचे आव्हान होते त्या व्यक्तीची ओळख पटवणे. यासाठी त्यांनी शरीरावरील इतर बारीक तपशील तपासले:

पहिले म्हणजे कानावरील खुणा: मृत व्यक्तीच्या उजव्या कानाच्या पाळीला दोने छिद्रे होती आणि डाव्या कानाला एक.

दुसरे म्हणजे पायावरील डाग: त्याच्या पायावर एक विशिष्ट जुना डाग होता.

या खुणांवरून आणि बेपत्ता व्यक्तीच्या तक्रारीवरून अखेर ती व्यक्ती सी. अलवंदर असल्याचे निष्पन्न झाले. अलवंदर हे पेनाचा व्यवसाय करणारे सेल्समन होते. त्यांच्या पत्नीनेही या खुणांवरून त्यांची ओळख पटवली. विशेष म्हणजे, अलवंदर यांच्या पहिल्या महायुद्धाच्या काळातील ब्रिटिश मिलिटरी रेकॉर्डमधील अंगठ्याचे ठसे मिळवून त्यांच्या बोटांचे ठसे मॅच करण्यात आले होते.

प्रेम, वासना आणि मलबार सुऱ्याने केलेला वार!

पोलिसांनी जेव्हा या प्रकरणाचा तपास केला, तेव्हा एका भयानक त्रिकोणी प्रेमाची कथा समोर आली. अलवंदर हे व्यवसायाने साडी विक्रेता असलेल्या प्रभाकर मेनन आणि त्यांची पत्नी देवकी मेनन यांच्या ओळखीचे होते. अलवंदर यांचे देवकीसोबत विवाहबाह्य संबंध होते आणि लग्न झाल्यानंतरही ते देवकीचा पाठलाग करत होते, तिच्यावर दबाव टाकत होते.

२८ ऑगस्ट १९५२ रोजी अलवंदर देवकीच्या घरी गेले. तिथेच पूर्वनियोजित कटानुसार प्रभाकर मेनन याने एका मलबार सुऱ्याने अलवंदर यांचा गळा चिरून खून केला. पुरावा नष्ट करण्यासाठी त्यांनी धड ट्रंकमध्ये भरून ट्रेनमध्ये पाठवून दिले आणि डोकं समुद्रकिनाऱ्यावर नेऊन पुरले.

या गाजलेल्या खटल्यात न्यायालयाने प्रभाकर मेनन याला ७ वर्षांची सक्तमजुरी आणि देवकी हिला ३ वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावली होती.

एका डोक्याचे दोन तुकडे का झाले?

न्यायालयाचा निकाल लागला, आरोपींनी शिक्षा भोगली, पण अलवंदर यांच्या शरीराचे अवयव मात्र इतिहासाचे साक्षीदार बनून वैद्यकीय महाविद्यालयातच राहिले. पण मग या डोक्याचे दोन तुकडे का झाले? याचे कोणतेही लेखी रेकॉर्ड उपलब्ध नाही.

फॉरेन्सिक तज्ज्ञांच्या मते, त्या काळात मद्रास आणि मदुराई या दोन्ही ठिकाणच्या वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये फॉरेन्सिकचे धडे देण्यासाठी अशा मानवी अवशेषांची गरज असायची. त्यामुळेच, अलवंदर यांचे डोकं मधोमध दोन भागांत कापले गेले असावे. पहिला अर्धा भाग मद्रास मेडिकल कॉलेजमध्ये जतन करण्यात आला. दुसरा अर्धा भाग मदुराई मेडिकल कॉलेजला पाठवण्यात आला, जिथे अलवंदर यांचे धड सापडले होते. जेणेकरून दोन्ही ठिकाणच्या विद्यार्थ्यांना गुन्हे अन्वेषणातील शरीररचनाशास्त्राचे महत्त्व शिकवता येईल.

निवृत्त प्राध्यापक डॉ. सी. मनोहर सांगतात की, आज आपल्याकडे डिएनए आणि फॅन्सी सायंटिफिक टेस्ट आहेत. पण त्या काळी काहीही नसतानाही, केवळ कौशल्याच्या जोरावर संशय उरणार नाही असा अचूक तपास केला गेला.

आज ७४ वर्षांनंतरही, जेव्हा जेव्हा फॉरेन्सिक विज्ञानाचा इतिहास आणि ओळख पटवण्याची आव्हाने शिकवली जातात, तेव्हा जार नंबर M११ मधील हे अर्धं डोकं आणि अलवंदर यांची केस विद्यार्थ्यांना थक्क करते. व्यक्ती संपली, केस संपली, पण गुन्हेगारीच्या इतिहासातील हे थरारक पान आजही त्या काचेच्या बरणीत जिवंत आहे!

स्वकमाईवर बापाला बाप सिद्ध करण्यासाठी लढाई!

२० वर्षांनंतर पितृत्वाच्या शोधात मुलीची सर्वोच्च न्यायालयात धाव; डीएनए चाचणीसाठी नोटीस जारी

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

एका अत्यंत संवेदनशील आणि कायदेशीरदृष्ट्या महत्त्वाच्या प्रकरणात, सर्वोच्च न्यायालयाने एका वकिलाला नोटीस बजावून १८ सप्टेंबरपर्यंत उत्तर मागितले आहे. एका मुलीने आपल्या कथित जैविक पित्याची डीएनए चाचणी करण्याची मागणी केली असून, या चाचणीचा संपूर्ण खर्च स्वतः उचलण्याची तयारी दर्शवली आहे. सुमारे दोन दशकांपूर्वी पैशांअभावी रखडलेली ही कायदेशीर लढाई आता मुलीने सज्ञान झाल्यावर पुन्हा सुरू केली आहे.

न्यायमूर्ती पी. एस. नरसिंहा आणि न्यायमूर्ती अरविंद कुमार यांच्या खंडपीठासमोर

या प्रकरणाची सुनावणी झाली. याचिकाकर्त्या मुलीच्या वतीने अधिवक्ता वात्सल्य विग्या यांनी न्यायालयात बाजू मांडली.

याचिकाकर्त्या मुलीने दिलेल्या माहितीनुसार, तिचे आजोबा महाराष्ट्रातील चंद्रपूर येथील एका कोळसा खाणीत काम करत होते. २००२ मध्ये ते प्रकृतीअस्वास्थ्यामुळे कामासाठी अपात्र ठरले. त्यांच्या जागेवर अनुकंपा तत्त्वावर नोकरी मिळवण्यासाठी तिच्या आईने एका वकिलाची मदत घेतली होती. यादरम्यान, लग्न करण्याचे आमिष दाखवून त्या वकिलाने तिच्या आईसोबत शारीरिक संबंध ठेवले, ज्यातून २००३ मध्ये याचिकाकर्त्या मुलीचा जन्म झाला. मात्र, नंतर त्या व्यक्तीने लग्न करण्यास आणि मुलीला आपले नाव देण्यास नकार दिला.

२००६ मध्ये मुलीच्या आईने उदरनिर्वाह भत्ता

> कथित जैविक पित्याने नाते स्वीकारण्यास नकार दिला होता. २००६ मध्ये जेव्हा आईने कोर्टात धाव घेतली, तेव्हा याचिकाकर्ती अल्पवयीन होती आणि आर्थिक विवंचनेमुळे डीएनए चाचणी होऊ शकली नव्हती.

आणि डीएनए चाचणीसाठी कनिष्ठ न्यायालयात दाद मागितली होती. त्यावेळी संबंधित वकिलाने डीएनए चाचणीला संमती दिली, मात्र त्याचा खर्च देण्यास नकार दिला. आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने आई तो खर्च करू शकली नाही. परिणामी, ट्रायल कोर्ट आणि त्यानंतर मुंबई उच्च न्यायालयाने तिची याचिका फेटाळली होती.

सज्ञान झाल्यावर मुलीचा पुन्हा संघर्ष

२०२३ मध्ये याचिकाकर्तीने १८ वर्षे पूर्ण करून सज्ञान झाल्यावर स्वतः न्यायालयात अर्ज केला. "२००६ मध्ये मी अल्पवयीन होते, पण आता मी सज्ञान असून डीएनए चाचणीचा सर्व खर्च स्वतः उचलण्यास सक्षम आहे," अशी भूमिका तिने घेतली. तथापि, "२० वर्षांपूर्वीच्या न्यायालयीन आदेशांना अंतिम स्वरूप आले असून, आता त्यात बदल करता येणार नाही," असे म्हणत उच्च न्यायालयाने २ एप्रिल रोजी तिची याचिका फेटाळून लावली होती. या निर्णयाला मुलीने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. सर्वोच्च न्यायालयाने आता संबंधित वकिलाला नोटीस पाठवून यावर स्पष्टीकरण मागितले आहे.

मास्टर कमर्शियल रिअल इस्टेट: व्यावसायिक रिअल इस्टेटमधून नफा मिळवण्याचे मार्ग

भारतातील रिअल इस्टेट क्षेत्र सध्या वेगाने विस्तारत असून, पारंपरिक गुंतवणुकीपलीकडे जाऊन व्यावसायिक मालमत्तांमध्ये (COMMERCIAL REAL ESTATE) गुंतवणूक करण्याकडे लोकांचा कल वाढतो आहे. मात्र, योग्य माहिती आणि मार्गदर्शनाअभावी अनेक गुंतवणूकदार यात पाऊल टाकण्यास कचरतात. याच पार्श्वभूमीवर, नवशिक्या तसेच अनुभवी गुंतवणूकदारांना व्यावसायिक मालमत्तांमधून खात्रीशीर नफा मिळवून देणारे आणि झेब्रा लर्न बुक्सतर्फे प्रकाशित "मास्टर कमर्शियल **रिअल इस्टेट:** ३०+ प्रॉफिट स्ट्रॅटेजीज फॉर न्यू इन्व्हेस्टर्स" हे एक अत्यंत व्यावहारिक आणि अभ्यासपूर्ण पुस्तक बाजारात दाखल झाले आहे. रिअल इस्टेट क्षेत्रातील नामांकित तज्ज्ञ अश्विंदर आर सिंग यांनी लिहिलेले हे पुस्तक कार्यालयीन जागा, दुकाने, गोदामांची खरेदी-विक्री आणि भाडेतत्त्वावरील व्यवहारांमधून सुरक्षितपणे उत्पन्न मिळवण्याचे प्रभावी मार्ग दाखवते.



पुस्तकातून काय शिकायला मिळते?

या पुस्तकात व्यावसायिक रिअल इस्टेटच्या गुंतवणुकीशी संबंधित सर्व तांत्रिक आणि व्यावहारिक बाजू सोप्या भाषेत मांडण्यात आल्या आहेत:

योग्य जागेचा शोध आणि भाडे करार: गुंतवणुकीसाठी सर्वोत्तम लोकेशन कसे ओळखावे आणि दीर्घकालीन फायद्यासाठी भाडे कराराची (LEASE STRUCTURE) आखणी कशी करावी, याचे अचूक नियोजन यात आहे.

आधुनिक गुंतवणूक आणि वित्तपुरवठा: आरइआयटी म्हणजेच रिअल इस्टेट इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट, विविध गृहकर्ज व वित्तपुरवठ्याचे पर्याय आणि भाडेकरूची पार्श्वभूमी तपासणे (TENANT PROFILING) याविषयीच्या आधुनिक रणनीती यात समाविष्ट आहेत.

मूल्यांकन आणि कायदेशीर पूर्तता: मालमत्तेचे अचूक मूल्यांकन करणे, खरेदीपूर्वीची तांत्रिक व कायदेशीर तपासणी आणि सरकारी नियमांचे पालन कसे करावे, याचे सविस्तर मार्गदर्शन यात मिळते.

सह-कार्यालयीन जागा आणि शॉपिंग सेंटर्स: सध्या वेगाने वाढणाऱ्या को-वर्किंग स्पेस, शॉपिंग सेंटर्स आणि औद्योगिक मालमत्तांचे मूल्यांकन कसे करावे, याचे विश्लेषण पुस्तकात केले आहे.

हे पुस्तक का महत्त्वाचे आहे?

लेखक अश्विंदर आर सिंग यांना रिअल इस्टेट क्षेत्रातील अनेक दशकांचा प्रत्यक्ष अनुभव आहे. त्यांनी पुस्तकात केवळ सैद्धांतिक माहिती न देता, प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी उपयुक्त ठरणाऱ्या चौकटी (FRAMEWORKS), टप्प्याटप्प्याने घ्यावयाची काळजी (CHECKLISTS) आणि जोखीम कमी करून नफा वाढवणाऱ्या ३० हून अधिक सिद्ध झालेल्या रणनीती दिल्या आहेत. त्यामुळे वाचक कोणत्याही संभ्रमाशिवाय थेट आणि हुशारीने गुंतवणूक करू शकतात.

कोणासाठी उपयुक्त?

हे पुस्तक पहिल्यांदाच कमर्शियल रिअल इस्टेटमध्ये गुंतवणूक करू इच्छिणारे नागरिक, रिअल इस्टेट व्यावसायिक आणि नियमित निष्क्रिय उत्पन्न मिळवू पाहणाऱ्या उद्योजकांसाठी अत्यंत मार्गदर्शक ठरणारे आहे.

भारतात सध्या व्यावसायिक रिअल इस्टेट मार्केट तेजीत आहे. अशा काळात अचूक आणि विश्वासार्ह मार्गदर्शनाच्या जोरावर आर्थिक प्रगती करू इच्छिणाऱ्या प्रत्येकासाठी हे पुस्तक संग्राह्य

लॉ ऑफ परज्युरी: शपथेवर खोटी साक्ष आणि बनावट दस्तऐवज

न्यायालयीन प्रक्रियेत सत्यता आणि विश्वासार्हता टिकवून ठेवण्यासाठी शपथेवर दिलेली साक्ष आणि सादर केलेले दस्तऐवज अत्यंत महत्त्वाचे असतात. मात्र, अनेक प्रकरणांमध्ये जाणीवपूर्वक खोटी साक्ष देणे, दस्तऐवजांमध्ये फेरफार करणे किंवा न्यायालयाची दिशाभूल करणे यासारखे प्रकार घडतात. कायद्याच्या भाषेत याला 'परज्युरी' म्हणजेच शपथेवर खोटी साक्ष देणे असे म्हणतात. देशात लागू झालेल्या नवीन फौजदारी कायद्यांच्या संदर्भासह याच अत्यंत संवेदनशील विषयावर सखोल भाष्य करणारे आणि कायदेतज्ज्ञ कांत मणी लिखित "लॉ ऑफ परज्युरी" हे नवीन अभ्यासपूर्ण पुस्तक कायदे क्षेत्रात दाखल झाले आहे. या पुस्तकात खोटी साक्ष, बनावट दस्तऐवज तयार करणे, फसवणूक, मालमत्तेचा अपहार आणि या गुन्ह्यांची चौकशी व खटला चालवण्याची नवीन फौजदारी कायद्यांनुसार असणारी प्रक्रिया सोप्या भाषेत मांडण्यात आली आहे.



पुस्तकातील प्रमुख कायदेशीर मुद्दे आणि वर्गीकरण :

- फसवणूक आणि मालमत्तेचा अपहार पुस्तकाच्या सुरुवातीला तथ्य दडवून केलेली फसवणूक आणि लबाडीच्या हेतूने मालमत्तेचा केलेला गैरविनियोग किंवा अपहार याविषयीच्या तरतुदी स्पष्ट करण्यात आल्या आहेत. आर्थिक आणि दिवाणी स्वरूपाच्या गुन्ह्यांमध्ये या तरतुदी कशा लागू होतात, याचे विवेचन यात आहे.
- खोटी साक्ष आणि पुरावे बनवणाऱ्यांचा पर्दाफाश न्यायालयात खोटे पुरावे सादर करणाऱ्या किंवा खोट्या साक्षी रचणाऱ्या पक्षकारांचा पर्दाफाश कसा करावा, यावर पुस्तकात विशेष भर देण्यात आला आहे. शपथेवर विसंगत विधाने करणे आणि सार्वजनिक न्यायाविरुद्ध गुन्हे करणे याबद्दलच्या कायदेशीर परिणामांची सविस्तर माहिती यात देण्यात आली आहे.
- दस्तऐवज आणि मालमत्ता चिन्हांशी संबंधित गुन्हे बनावट दस्तऐवज तयार करणे, अधिकृत कागदपत्रांमध्ये फेरफार करणे आणि मालमत्तेच्या चिन्हांशी छेडछाड करणे यासारख्या गुन्ह्यांचे स्वरूप आणि त्यावरील कायदेशीर कारवाईची प्रक्रिया लेखकाने कायदेकलमांच्या आधारे स्पष्ट केली आहे.
- चौकशी आणि खटला चालवण्याची कार्यपद्धती न्यायालयाची अवमानना करणे, सार्वजनिक न्यायाविरुद्ध गुन्हे करणे किंवा पुराव्या म्हणून सादर केलेल्या दस्तऐवजांमध्ये फेरफार करणाऱ्यांवर खटला कसा चालवावा आणि अशा प्रकरणांमध्ये चौकशी कशी करावी, याची अचूक कार्यपद्धती यात दिली आहे.
- अटक, एफआयआर आणि सर्च वॉरंट नव्या फौजदारी कायद्यांच्या चौकटीत आरोपीला अटक करण्याचे नियम, प्रथम खबरी अहवाल म्हणजेच एफआयआर नोंदवण्याची प्रक्रिया आणि न्यायालयाकडून सर्च वॉरंट मिळवून तपास करण्याचे अधिकार या तांत्रिक बाबींचे सुलभ मार्गदर्शन या पुस्तकात समाविष्ट आहे.

न्यायालयीन सराव आणि सिद्धांताचा सुवर्णमध्य

हे पुस्तक केवळ कायदेशीर सिद्धांतांची माहिती देत नाही, तर न्यायालयात प्रत्यक्ष कामकाज करताना वकिलांना आणि न्यायाधीशांना येणाऱ्या व्यावहारिक अडचणींवर प्रकाश टाकते. पुस्तकातील प्रत्येक प्रकरणाची मांडणी ही न्यायालयीन निवाड्यांचा आधार घेऊन करण्यात आली आहे.

कायदे क्षेत्रासाठी अत्यंत उपयुक्त संदर्भग्रंथ

न्यायालयीन प्रक्रियेचा गैरवापर रोखण्यासाठी आणि सत्य समोर आणण्यासाठी हे पुस्तक विधी क्षेत्रातील घटकांसाठी एक उत्तम मार्गदर्शक ठरेल. नवीन फौजदारी कायद्यांनुसार बदललेल्या कार्यपद्धतीचा समावेश असल्यामुळे न्यायाधीश, वकील, पोलीस अधिकारी, कायद्याचे प्राध्यापक आणि विधी क्षेत्रातील संशोधक यांच्या ग्रंथालयात हे पुस्तक मोलाची भर घालणारे ठरेल.

अटॅचमेंट ऑफ प्रॉप्रर्टी अँड इट्स रिमुव्हल: सिव्हिल अँड क्रिमिनल:

न्यायालयीन प्रक्रियेत मालमत्ता जप्ती आणि ती जप्ती उठवणे हा अत्यंत क्लिष्ट आणि संवेदनशील विषय मानला जातो. दिवाणी दावे असोत की फौजदारी गुन्हे, मालमत्तेवर टाच आणणे आणि त्याविरुद्ध दाद मागणे या प्रक्रियेत अनेक तांत्रिक बारकावे असतात. याच महत्त्वाच्या विषयावर प्रकाश टाकणारे आणि कायदेतज्ज्ञ नम्रता शुक्ला लिखित "अटॅचमेंट ऑफ प्रॉप्रर्टी अँड इट्स रिमुव्हल: सिव्हिल अँड क्रिमिनल" हे नवे मार्गदर्शक पुस्तक कायदे क्षेत्रात दाखल झाले आहे.



या पुस्तकात दिवाणी अंमलबजावणी, मनाईहुकूम, निर्णयापूर्वी अटक, फौजदारी जप्ती आणि त्याशी संबंधित वैधानिक नमुने व महत्त्वपूर्ण न्यायनिवाड्यांचे अत्यंत सोप्या भाषेत वर्गीकरण करण्यात आले आहे.

पुस्तकाची तीन प्रमुख भागांत विभागणी

वाचकांच्या सोयीसाठी लेखिकेने या पुस्तकाची रचना तीन स्पष्ट भागांमध्ये केली आहे:

१. पहिला भाग: दिवाणी प्रक्रिया या भागात दिवाणी न्यायालयाच्या हुकूमनाम्यांची अंमलबजावणी करताना मालमत्ता कशी जप्त केली जाते, याचे सविस्तर विवेचन आहे. याशिवाय हंगामी मनाईहुकूम, कायदेशीर नोटीस, प्रकरणातील आनुषंगिक आणि विशेष कामकाज, तसेच हुकूमनामा किंवा निकाल लागण्यापूर्वीच प्रतिवादीची मालमत्ता जप्त करणे किंवा त्याला अटक करणे यासारख्या महत्त्वाच्या तरतुदींवर यात सखोल भाष्य करण्यात आले आहे. संक्षिप्त दिवाणी प्रक्रिया आणि विशेष प्रकरणांमधील जप्तीची नियमावलीही यात स्पष्ट केली आहे.

२. दुसरा भाग: फौजदारी प्रक्रिया फौजदारी गुन्ह्यांमध्ये गुन्ह्याशी संबंधित किंवा बेकायदेशीर मार्गाने मिळवलेली मालमत्ता जप्त करणे आणि ती सरकारजमा करणे याविषयीच्या तरतुदी या भागात आहेत. तसेच वादग्रस्त मालमत्तेची विल्हेवाट लावणे आणि परस्पर सहकार्यासाठी असलेल्या विशेष कायदेशीर व्यवस्थेअंतर्गत मालमत्ता जप्तीची नेमकी काय प्रक्रिया असते, याचा अचूक आढावा यात घेण्यात आला आहे.

३. तिसरा भाग: वैधानिक नमुने न्यायालयीन कामकाजात अचूक मसुदा आणि नमुन्यांना अनन्यसाधारण महत्त्व असते. हेच लक्षात घेऊन पुस्तकाच्या तिसऱ्या भागात दिवाणी आणि फौजदारी जप्ती प्रक्रियेसाठी लागणारे सर्व वैधानिक अर्ज व अधिकृत नमुने समाविष्ट करण्यात आले आहेत.

महत्त्वाच्या न्यायनिवाड्यांसह व्यावहारिक मार्गदर्शन

केवळ पुस्तकी कायद्याचे कलम न सांगता, सर्वोच्च न्यायालय आणि विविध उच्च न्यायालयांनी या विषयावर दिलेले महत्त्वपूर्ण निकाल लेखिकेने सोप्या भाषेत समजावून सांगितले आहेत. सिद्धांत आणि प्रत्यक्ष न्यायालयीन सराव या दोन्हीचा मेळ या पुस्तकात घालण्यात आला आहे.

वकील आणि अभ्यासकांसाठी 'नॉव्हिगेटर'

जप्तीशी संबंधित गुंतागुंतीच्या प्रकरणांमध्ये मार्ग काढण्यासाठी हे पुस्तक कायदे क्षेत्रातील व्यक्तींसाठी एका 'नॉव्हिगेटर'सारखे काम करेल. न्यायालयीन कामकाजात रोज लागणारे दिवाणी आणि फौजदारी कायदे एकाच छताखाली आणल्यामुळे न्यायाधीश, वकील, पोलीस अधिकारी, विधी क्षेत्रातील प्राध्यापक आणि विद्यार्थी यांच्यासाठी हे पुस्तक अत्यंत संग्राह्य आणि मूल्यवान ठरणार आहे.

ऑल अबाऊट बेल: नव्या फौजदारी कायद्यांनुसार जामीन प्रक्रियेचे मार्गदर्शन:

देशात नवीन फौजदारी कायदे लागू झाल्यानंतर कायदेशीर प्रक्रियेत, विशेषतः जामीन मिळवण्याच्या नियमांमध्ये मोठे बदल झाले आहेत. या बदललेल्या कायदेशीर चौकटीत जामिनाशी संबंधित तरतुदी अत्यंत सोप्या आणि सुटसुटीत भाषेत मांडणाऱ्या 'ALL ABOUT BAIL: WHEN, WHERE & BY WHOM' या पुस्तकाची सुधारित चौथी आवृत्ती नुकतीच प्रकाशित झाली आहे. नव्या 'भारतीय नागरिक सुरक्षा संहिता' अंतर्गत जामीन प्रक्रियेचा मार्ग कसा असेल, याचे सखोल विश्लेषण या पुस्तकात करण्यात आले आहे.



जुन्या आणि नव्या कायद्यांची तुलनात्मक मांडणी : हे पुस्तक पूर्वाश्रमीच्या 'फौजदारी प्रक्रिया संहिता' आणि आता लागू झालेल्या 'भारतीय नागरिक सुरक्षा संहिता' मधील जामीनविषयक तरतुदींची सविस्तर तुलना करते. यामुळे कायदेतज्ज्ञ आणि सर्वसामान्यांना नेमका काय बदल झाला आहे, हे एकाच नजरेत समजून घेणे सोपे जाते.

प्रश्न-उत्तर स्वरूपातील सुलभ रचना : पुस्तकाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे याची रचना प्रश्न-उत्तर स्वरूपात करण्यात आली आहे. 'जामीन कधी, कुठे आणि कोणाकडून मिळू शकतो?' या मूलभूत प्रश्नापासून ते क्लिष्ट तांत्रिक बाबींपर्यंत सर्व शंकांचे निरसन या स्वरूपात केल्यामुळे हे पुस्तक केवळ न्यायाधीशांना किंवा वकिलांनाच नाही, तर कायद्याचे विद्यार्थी आणि अगदी सर्वसामान्य वाचकांनाही सहज समजणारे झाले आहे.

पुस्तकाची प्रमुख वैशिष्ट्ये : नवे कायदे: नव्या भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या चौकटीत जामीन तरतुदींचे सखोल आणि अभ्यासपूर्ण विश्लेषण.

न्यायालयीन निवाड्यांचा समावेश: सर्वोच्च न्यायालय तसेच पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाच्या जामीनविषयक महत्त्वपूर्ण आणि ताज्या निकालांचे सार आणि विश्लेषण यात समाविष्ट आहे.

अडचणींवर व्यावहारिक उपाय: जामीन अर्ज दाखल करताना वकिलांना किंवा अर्जदारांना कोणत्या व्यावहारिक अडचणींचा सामना करावा लागतो आणि त्यावर कशी मात करावी, याचे व्यावहारिक मार्गदर्शन यात आहे.

सिद्धांत आणि प्रत्यक्ष सराव यांचा मेळ: हे पुस्तक केवळ पुस्तकी ज्ञान देत नाही, तर न्यायालयात प्रत्यक्ष काम करताना येणाऱ्या आव्हानांवर बोट ठेवते.

कायदे क्षेत्रासाठी मूल्यवान ठेवा : सिद्धांत आणि प्रत्यक्ष सराव या दोन्हीमधील दरी मिटवणारे हे एक उत्कृष्ट साधन आहे. बदलत्या कायद्याच्या काळात स्वतःला अद्ययावत ठेवण्यासाठी हे पुस्तक प्रत्येक न्यायाधीश, वकील, पोलीस अधिकारी आणि कायद्याच्या विद्यार्थ्यांच्या संग्रही असावे असेच आहे. कायदेशीर ग्रंथालयांमध्ये या पुस्तकाची भर नक्कीच मोलाची ठरेल, असा विश्वास कायदेतज्ज्ञांकडून व्यक्त केला जात आहे.

'न्यायालयाच्या आवारात दिवसभर उभे राहा!'

२७ वर्षांचा खटला, १०० हून अधिक सुनावण्या, ८० वर्षांच्या आजोबांची अखेर सुटका! उत्तर प्रदेशातील बागपत न्यायालयाचा वृद्धाप्रती अनोखा 'सहानुभूतीपूर्वक' न्याय!

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

न्यायालयाचा खटला आणि त्याचा निकाल लागण्यासाठी लागणारी वर्षं हा भारतात नेहमीच चिंतेचा विषय राहिला आहे. अशीच एक थक्क करणारी आणि डोळ्यात अंजन घालणारी घटना उत्तर प्रदेशातील बागपत न्यायालयातून समोर आली आहे. एका किरकोळ वादातून सुरू झालेला फौजदारी खटला तब्बल २७ वर्षे चालला. वयाच्या ५३ व्या वर्षी सुरू झालेल्या या न्यायालयीन लढाईचा शेवट तब्बल ८० व्या वर्षी झाला. अखेर, न्यायाधीशांनी वृद्धाची खालावलेली प्रकृती आणि वय लक्षात घेऊन अत्यंत अनोखी आणि सहानुभूतीपूर्वक शिक्षा सुनावत त्यांची सुटका केली. "न्यायालय बरखास्त होईपर्यंत दिवसभर कोर्टात उभे राहा आणि १,००० रुपये दंड भरा," अशी 'प्रतीकात्मक' शिक्षा सुनावत न्यायालयाने या प्रदीर्घ प्रकरणावर अखेरचा पडदा टाकला.

या प्रकरणाची पाळेमुळे थेट गेल्या शतकात म्हणजेच २६ जून १९९९ रोजी रुजली होती. बागपत जिल्ह्यातील सरूरपूर कलान गावचे रहिवासी असलेल्या धारा सिंग यांनी त्यांचेच गावकरी राजेंद्र सिंग आणि इतर दोघांविरुद्ध स्थानिक पोलीस ठाण्यात 'तक्रार' नोंदवली होता. राजेंद्र सिंग यांनी आपल्याला शिवीगाळ केली आणि जिवे मारण्याची धमकी दिली, असा आरोप तक्रारदाराने केला होता. या तक्रारीनंतर पोलिसांनी फौजदारी धमकावणे आणि इतर कलमांखाली गुन्हा दाखल करून तपास सुरू केला.

त्यानंतर पोलिसांनी न्यायालयात आरोपपत्र (चार्जशीट) दाखल केले. दरम्यानच्या काळात मुख्य आरोपी राजेंद्र सिंग यांचे केस रेकॉर्ड इतर आरोपींपासून वेगळे करण्यात आले आणि त्यांच्यावर स्वतंत्रपणे खटला चालवण्यात आला. पण हा खटला एका वर्षावरून दुसऱ्या वर्षावर, असे करत तब्बल पाव शतकाहून अधिक काळ रेंगाळत राहिला.

३ दशकांचा वनवास व १०० हून अधिक सुनावण्या

राजेंद्र सिंग यांनी तब्बल तीन दशके म्हणजेच २७ वर्षे या खटल्याचा सामना केला. या प्रदीर्घ काळात त्यांना १०० पेक्षा जास्त सुनावण्यांना सामोरे जावे लागले. प्रत्येक तारखेला न्यायालयात हजेरी लावणे, वकिलांची फी भरणे आणि मानसिक ताण सहन करणे यात त्यांची हक्काची अनेक वर्षे निघून गेली. ५३ वर्षांचे तरुण राजेंद्र सिंग हे या खटल्याच्या चक्रव्यूहात अडकून कधी ८० वर्षांचे वृद्ध झाले, हे त्यांचे त्यांनाच समजले नाही.नुकतेच वाढत्या वयामुळे आणि गंभीर आजारपणामुळे ते एका सुनावणीला न्यायालयात

हजर राहू शकले नाहीत. त्यामुळे न्यायालयाने त्यांच्याविरुद्ध अजामीनपात्र अटक वॉरंट जारी केले होते. शारीरिक व्याधींनी ग्रस्त असलेल्या सिंग यांना या वयात अटकेची टांगती तलवार सहन करणे अशक्य झाले होते.

अखेर हे प्रकरण मुख्य न्यायदंडाधिकारी (CJM) मनिंद्रपाल सिंग यांच्या न्यायालयासमोर आले. वयोमानामुळे अंगात त्राण नसलेले, थरथरत्या हातापायांनी कोर्टात उभे राहिलेल्या ८० वर्षीय राजेंद्र सिंग यांनी न्यायालयासमोर स्वतःचा गुन्हा कबूल केला. त्यांनी अत्यंत भावूक होऊन न्यायालयाकडे दयेची आणि मऊ भूमिकेची याचना केली. आपले वय आणि आजारपण पाहता आता कोर्टाच्या वाऱ्या करणे शक्य नसल्याचे त्यांनी सांगितले. सीजेएम मनिंद्रपाल सिंग यांनी आरोपीचे वय, त्यांची खालावलेली तब्येत आणि त्यांनी आधीच २७ वर्षे कोर्टाच्या वाऱ्या करून भोगलेली 'अघोषित शिक्षा' विचारात घेतली. न्यायमूर्तींनी कायदा आणि मानवता यांचा सुवर्णमध्य साधत एक अनोखा निर्णय दिला. त्यांनी राजेंद्र सिंग यांना 'न्यायालय बरखास्त होईपर्यंत कोर्टात उभे राहण्याची' प्रतीकात्मक शिक्षा आणि १,००० रुपये दंड ठोठावला. ही एक दिवसाची शिक्षा पूर्ण केल्यानंतर सिंग हे सन्मानाने आणि मुक्त होऊन आपल्या घरी परतले.

न्यायालयाच्या या निर्णयानंतर राजेंद्र सिंग यांच्या चेहऱ्यावर सुटकेचे समाधान स्पष्ट दिसत होते. त्यांनी भावूक होत सांगितले, "मी आता ८० वर्षांचा आहे. मला अनेक शारीरिक आजार आहेत. प्रत्येक सरत्या वर्षासोबत न्यायालयात प्रवास करणे माझ्यासाठी अत्यंत कठीण आणि यातनादायी होत चालले होते. मी न्यायालयाचे मनापासून आभार मानतो की त्यांनी हे प्रकरण अखेर संपवले आणि मला या छळातून मुक्ती दिली. आज खऱ्या अर्थाने मला दिलासा मिळाला आहे." दरम्यान, याच बातमीच्या पार्श्वभूमीवर देशातील प्रलंबित खटल्यांबाबत सर्वोच्च न्यायालयाने अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. १९८३ मध्ये अवघ्या २८ व्या वर्षी हत्येच्या आरोपाखाली अटक झालेल्या एका व्यक्तीला त्याच्या जन्मठेपेच्या शिक्षेविरुद्ध अपील करण्यासाठी अलाहाबाद उच्च न्यायालयात तब्बल ४ दशके (४० वर्षे) वाट पाहावी लागली. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, अलाहाबाद हायकोर्टातील हजारो प्रलंबित याचिकांमुळे आणि सुनावणीस होणाऱ्या विलंबाने न्यायाची चाके पूर्णपणे रुतली आहेत. ही परिस्थिती अत्यंत चिंताजनक असून, हायकोर्टातील प्रकरणांचा जलद गतीने निपटारा करण्यासाठी काहीतरी नाविन्यपूर्ण उपाययोजना करण्याची तातडीची गरज निर्माण झाली आहे.

लग्नाला नकार, १० वर्षांची जेल; 'त्याच' अल्पवयीन प्रेयसीशी लग्न, निर्दोष मुक्त!

चित्रपटासारखा ट्विस्ट: प्रेयसीचा दुसरा संसार मोडला; जामिनावर सुटलेल्या प्रियकराशी मांडला पुन्हा संसार, न्यायालयाने वापरले विशेष अधिकार!

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

एका अत्यंत आगळ्यावेगळ्या आणि 'विचित्र' कायदेशीर पेचावर पडदा टाकत देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने आपल्या विशेषाधिकाराचा वापर करून एका तरुणाची पोक्सो गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता केली आहे. दोन सज्ञान प्रेमी जीवांनी एकत्र येण्याचा निर्णय घेतल्यानंतर, त्यांच्या सुखी संसाराच्या आड येणारी १० वर्षांची कठोर शिक्षा सुप्रीम कोर्टाने रद्दबातल ठरवली आहे. न्यायमूर्ती जे. के. माहेश्वरी आणि न्यायमूर्ती अतुल एस. चांदूरकर यांच्या खंडपीठाने भारतीय राज्यघटनेच्या कलम १४२ अंतर्गत आपल्या असाधारण अधिकारांचा वापर करत हा ऐतिहासिक निकाल दिला.

या संपूर्ण प्रकरणाची पार्श्वभूमी एखाद्या नाट्यमय चित्रपटासारखी आहे. काही वर्षांपूर्वी दोन अल्पवयीन तरुण-तरुणी एकमेकांच्या प्रेमात पडले होते. मात्र, एका वळणावर तरुणाने लग्न करण्यास नकार दिल्याने संतप्त झालेल्या इयत्ता १२ वीत शिकणाऱ्या त्या मुलीने त्याच्याविरुद्ध



पोलिसांत तक्रार दाखल केली. मुलगी अल्पवयीन असल्याने तरुणावर पोक्सो अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला. या प्रकरणात कोर्टाने त्याला दोषी ठरवून थेट १० वर्षांच्या कारावासाची कठोर शिक्षा सुनावली. २०११ मध्ये त्याची रवानगी तुरुंगात झाली.

दरम्यानच्या काळात, त्या तरुणीचा विवाह दुसऱ्या एका पुरुषासोबत लावून देण्यात आला. परंतु, तिचा हा नवा संसार केवळ तीनच दिवस टिकू शकला. तिच्या भूतकाळातील प्रेमसंबंधांची माहिती मिळताच तिच्या पतीने अवघ्या तीन दिवसांतच तिला सोडले आणि तिचा संसार मोडला.

इकडे शिक्षेचा काही काळ भोगल्यानंतर तो तरुण जामिनावर बाहेर आला. दुसरीकडे मुलीचा संसार मोडला होता. या कठीण काळात दोघे पुन्हा एकमेकांच्या संपर्कात आले. जुने हेवेदावे आणि कटुता विसरून त्यांनी पुन्हा एकदा एकत्र येण्याचा निर्णय घेतला. दोघांनी रीतसर विवाह केला आणि ते पती-पत्नी म्हणून सुखाने एकत्र राहू लागले. त्यांना या संसारातून मूलही झाले.

लग्नाला नकार दिल्याने सुरु झालेला हा कायदेशीर वाद शेवटी दोघांच्या विवाहानेच संपला.** आपला संसार सुरळीत सुरू असतानाच, जुनी कायदेशीर टांगती तलवार दूर करण्यासाठी या दाम्पत्याने मद्रास उच्च न्यायालयात (High Court) धाव घेतली. "आम्ही आता अधिकृतपणे पती-पत्नी असून आनंदाने एकत्र राहत आहोत. संपूर्ण सत्य वेगळेच आहे, त्यामुळे माझ्या पतीची शिक्षा रद्द करण्यात यावी," अशी विनंती त्या महिलेने उच्च न्यायालयाला केली. मात्र, कायदेशीर चौकटीचे बोट धरून उच्च न्यायालयाने तिची ही याचिका फेटाळून लावली.

सर्वोच्च न्यायालयाची 'मदतीचा हात' आणि कलम १४२

उच्च न्यायालयाकडून निराशा हाती आल्यानंतर या दाम्पत्याने सर्वोच्च न्यायालयाचे (Supreme Court) दार ठोठावले. सुप्रीम कोर्टाने प्रकरणाचे गांभीर्य आणि संवेदनशीलता ओळखून तामिळनाडूच्या हारुर येथील ज्युडिशियल मॅजिस्ट्रेटला या महिलेची जबानी आणि विवाहाची सत्यता तपासण्याचे आदेश दिले.

महिलेने कोर्टासमोर हजर राहून आपण पतीसोबत अत्यंत आनंदी असल्याचे सांगितले. तसेच सुरुवातीला तरुणाच्या कुटुंबीयांनी आपल्या पतीकडे १० लाख रुपयांची अतिरिक्त मागणी केली होती, जी त्यांच्या पतीने पूर्ण केली होती, अशीही माहिती समोर आली.

सर्वोच्च न्यायालयाने दोन्ही बाजू आणि सद्यस्थितीचा अत्यंत बारकाईने विचार केला. खंडपीठाने नमूद केले की, "अपिलकर्ता (तरुण) आणि पीडितेने आता ती सज्ञान झाल्यानंतर रीतसर विवाह केला आहे. या प्रकरणातील विशिष्ट आणि विलक्षण परिस्थिती पाहता, या केसच्या गुणवत्तेवर अधिक चर्चा नठरवत, आम्ही भारतीय राज्यघटनेच्या कलम १४२ अंतर्गत मिळालेल्या विशेषाधिकाराचा वापर करणे योग्य समजतो."

न्यायालयाने तत्काळ त्या तरुणाची पोक्सो अंतर्गत झालेली १० वर्षांची शिक्षा आणि दोषी असल्याचा निकाल बाजूला सारला. "नोंदवण्यात आलेली विधाने आणि परिस्थिती पाहता अपीलादाराची या आरोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे," असे न्यायालयाने स्पष्ट केले. सर्वोच्च न्यायालयाच्या या संवेदनशील निर्णयामुळे एका तुटता तुटता वाचलेल्या कुटुंबाला अखेर हक्काचा न्याय आणि सन्मान मिळाला आहे.

NATARAJ REALTY
Nataraj Realty
CIVIL ENGG. & CONTRACTORS
PROMOTERS & BUILDERS
Vikram Agarwal B.E. Civil
+91 9766532648
1041, Nataraj Court, Shukrawar Peth, Pune - 411 002
vikrammittal5006@gmail.com www.natarajrealty.com

Registration(PRGI) No. MHBIL/25/A1380: "Pune Bar And Bench", weekly newspaper owned & published by Vijay Prabhakar Chavan, and printed by Prasad Shantaram Pathak at the Sakal Media Pvt Ltd, Sr No. 159/160, behind Laxman Weigh Bridge, Saswad Road, Pune- 411028, Published at Pune Bar And Bench, Office No. 7, 1st floor, Chunawala Chambers, 103, Shivajinagar, Near Shikshan Mandal, Juna Topkhana, Pune-411005. Resident Editor : Vijay Prabhakar Chavan (Responsible for selection of news under PRB Act.)
Managing Editor: Mr. Mysore Jagadishbabu Srikant. All rights reserved. Reproduction in whole or in part without written permission of the publisher is prohibited. (contact : 99229 62535)